औरंगाबाद, नागपूर, पुणे, अमरावती, लातूर, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, मुंबई, जळगांव, रत्नागीरी, ठाणे, पालघर, नंदुरबार, नांदेड, चंद्रपूर, गडचिरोली, अहमदनगर, सातारा या विभागातून एकाच वेळी प्रकाशीत होणारे वृत्तपत्र

माहिती खात्रीची व प्रगतीची, देतो वेध भविष्याचा..

# नौकरी एक्सप्रेस

Marathi-Weekly

RNI.No.MAH/MAR2010/34125

छत्रपती संभाजीनगर

पाने : ८

किंमत : १५.००

वर्ष : १६ वे

अंक : ०९ वा

रविवार -१९ ते २५ ऑक्टोबर २०२५

E-mail:naukriexpress.impact@gmail.com

E-Paper : http://naukriexpress.co.in

Post Regd.No. G 2/RNP/AGD-415/2024-26

किंमत १७/-

सविस्तर वृत्त पान ८ वर पहा..

रेल्वेमध्ये १ हजार ७६३ पदांसाठी भरती

पहिल्या प्रयत्नात आले अपयश

टेरीटोरियल आर्मीत मोठी भर्ती

BSF कॉन्स्टेबल GD भरती

आदि कर्मयोगी अभियानात सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी गडचिरोली जिल्ह्याला राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्रदान

सविस्तर वृत्त पान ७ वर पहा..

साप्ताहिक नौकरी एक्सप्रेस,चालुघडामोडी कोडे

पुढील शैक्षणिक वर्षापासून चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा

नाशिकमध्ये 'तेजस LCA MK-1A लढाऊ विमानाचे पहिले उड्डाण यशस्वी

एक्झिक्युटिव आणि असिस्टंट माईन सर्व्हेयर पदांसाठी महा भरती!

सविस्तर वृत्त पान २/३ वर पहा..

भारतीय सशस्त्र सैन्यदलात अधिकारी पदाच्या तयारीसाठी एस.एस.बी. कोर्ससाठी मोफत प्रशिक्षण


देशातील सर्वात मोठ्या बँकेत मिळणार नोकरीची संधी?

'रेल इंडिया टेक्निकल अँड इकोनॉमिक सर्व्हिस'मध्ये ६०० जागांची मेगाभरती

५० हजार नोकरदारांना लवकरच मिळणार नारळ?

## संक्षिप्त

## पुणे महापालिकेत 'कनिष्ठ अभियंता' भरतीसाठी सुधारित जाहिरात



**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) वर्ग -३ या पदासाठी काही नवीन सामाजिक व समांतर आरक्षण प्रवर्गातील जागा उपलब्ध झाल्याने या पदांसाठी आता सुधारित जाहिरातीनुसार पदभरती होणार आहे. त्यानुसार इच्छुकांना ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत ऑनलाइन अर्ज करण्याची मुदत देण्यात आली आहे, अशी माहिती पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त एम.जे. प्रदीप चंद्रन यांनी दिली आहे.

राज्य शासन निर्णय दि. २७ फेब्रुवारी २०२४ नुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग (SEBC) प्रवर्गासाठी १० टक्के आरक्षण लागू करण्यात आले आहे. त्यामुळे पदसंख्या वाढवून नव्याने सुधारित आरक्षण संरचना जाहीर करण्यात आली आहे. सुधारित जाहिरातीत काही नवीन सामाजिक व समांतर आरक्षण प्रवर्गातील जागा उपलब्ध झाल्याने इच्छुक उमेदवारांना पुन्हा अर्ज करण्याची संधी देण्यात आली आहे. इच्छुकांनी ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावेत. यापूर्वी अर्ज केलेल्या उमेदवारांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. तथापि, कोणी नव्याने अर्ज केला, तर पूर्वीचा अर्ज बाद होऊन नवीन अर्जच ग्राह्य धरला जाईल. अर्ज व सविस्तर माहितीसाठी उमेदवारांनी पुणे महानगरपालिकेच्या https://www.pmc.gov.in/b/recruitment या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

## सैनिक स्कूल प्रवेश प्रक्रिया सुरू!

### लवकर करा अर्ज



**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/**सैनिक स्कूल प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक विद्यार्थी ३० ऑक्टोबरपर्यंत exams.nta.nic.in/sainik-school-society वर अर्ज करू शकतात. परीक्षा जानेवारीत होणार असून प्रवेश ६वी व ९वीत दिला जाईल.सैनिक शाळेत प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. जर तुम्हाला तुमच्या मुलाला सैनिक शाळेत दाखल करायचे असेल तर लवकरात लवकर अर्ज करावे. कारण शिवाची तारिक ३० ऑक्टोबर पर्यंत आहे. वर ६ वी आणि ९ वी साठी प्रवेश घेण्यात येत आहे. चला जाणून घेऊया संपूर्ण माहिती.

**कुठे कराल अर्ज?**

सैनिक शाळेत प्रवेश घेण्यासाठी तुम्हाला सर्वात आधी अर्ज करावे लागतील. त्यासाठी तुम्हाला सैनिक शाळेच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्यावे लागेल. exams.nta.nic.in/sainik-school-society या अधिकृत वेबसाइटवर भेट देऊन अर्ज करू शकता.

**परीक्षा कधी?**

सूचनेनुसार, सैनिक शाळांमध्ये प्रवेशासाठी नोंदणी करण्याची अतिंम दिनांक ३० ऑक्टोबर २०२५ आहे. अर्ज फॉर्म दुरुस्त करण्याची वेळ २ नोव्हेंबर ते ४ नोव्हेंबर दरम्यान खुली असेल. सैनिक शाळा प्रवेश परीक्षा जानेवारीमध्ये घेतली जाईल. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यास -ISSEE 2026 द्वारे देशभरातील ३३ प्रमुख सैनिक शाळांमध्ये इयत्ता ६ वी आणि ९ वी मध्ये प्रवेश मिळेल. परीक्षेच्या काही काळापूर्वी प्रवेशपत्रे जारी केली जातील. ही परीक्षा एकूण १९० शहरांमध्ये घेतली जाणार आहे.

**नोंदणी फीस किती?**

मागील वर्षीच्या तुलनेत अर्ज शुल्कात वाढ झाली आहे. जनरल, ओबीसी (एनसीएल), संरक्षण आणि माजी सैनिकांसाठी नोंदणी शुल्क ८५० आहे. एससी आणि एसटी प्रवर्गासाठी अर्ज शुल्क ७०० आहे.

**वय-** वयोमर्यादेबाबत, इयत्ता सहावीसाठी, वय ३१ मार्च २०२६ रोजी १० ते १२ वर्षे दरम्यान असणे गरजेचे आहे. इयत्ता नववीसाठी, वय ३१ मार्च २०२६ रोजी १३ ते १५ वर्षे दरम्यान असावे.

**परीक्षेचा पॅटर्न कसा असेल?**

माहितीनुसार, इयत्ता सहावीची परीक्षा हिंदी आणि इंग्रजीसह १३ माध्यमांमध्ये घेतली जाईल. परीक्षेसाठी एकूण १५० मिनिटे दिली जातील. एकूण ३०० गुणांसाठी प्रश्न विचारले जातील. दरम्यान, इयत्ता नववीच्या परीक्षेसाठी १८० मिनिटे असतील. ही परीक्षा एकूण ४०० गुणांची असेल.

# ISRO मध्ये भरती!

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** इसरोमध्ये सरकारी नोकरीचे स्वप्न पाहणाऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) अंतर्गत सतीश धवन अंतराळ केंद्र, श्रीहरिकोटा यांनी विविध पदांसाठी भरती जाहीर केली आहे.इसरोमध्ये सरकारी नोकरीचे स्वप्न पाहणाऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे.

भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) अंतर्गत सतीश धवन अंतराळ केंद्र, श्रीहरिकोटा यांनी विविध पदांसाठी भरती जाहीर केली आहे. या भरतीसाठीचे अधिकृत अधिसूचना जारी करण्यात आली असून अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक उमेदवार apps.shar.gov.in(https://apps.shar.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन १४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत अर्ज करू शकतात. जर तुम्ही या भरतीसाठी इच्छुक आहात तर निश्चित करण्यात आलेली मुदत तपासून घेण्यात यावी.

भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच इसरो ही भारत सरकारची राष्ट्रीय अंतराळ संस्था असून ती देशात अंतराळ तंत्रज्ञानाचा विकास आणि संशोधनाची कामे करते. रॉकेट प्रक्षेपण, उपग्रह तंत्रज्ञान, हवामान निरीक्षण, संचार व्यवस्था आणि अवकाश मोहिमांमध्ये इसरोने जगभरात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.आता तुम्हालाही या प्रतिष्ठित संस्थेत काम करण्याची संधी मिळू शकते.

**पात्रता -** शैक्षणिक अर्हता पाहिली तर, इसरोच्या या भरतीमध्ये पदानुसार वेगवेगळी शैक्षणिक पात्रता निर्धारित करण्यात आली आहे. काही पदांसाठी बी.ई., बी.टेक., बी.एस्सी. इंजिनिअरिंग किंवा डिप्लोमा धारक उमेदवार पात्र आहेत, तर काही पदांसाठी केमिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा, बी.ए., बी.एस्सी., पदवीधर, एसएसएलसी, एसएससी उत्तीर्ण उमेदवार तसेच आयटीआय किंवा नर्सिंग डिप्लोमा धारक उमेदवार अर्ज करू शकतात. पात्रतेसंबंधी सविस्तर माहिती उमेदवारांनी अधिकृत अधिसूचनेतून तपासावी.

**अर्ज पद्धत-**अर्ज करण्यासाठी उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन फॉर्म भरावा.

फॉर्ममध्ये आवश्यक कागदपत्रे, फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करावी लागेल. अर्ज सादर करताना दिलेली सर्व माहिती योग्य असल्याची खात्री करावी.

**ऑनलाईन अर्ज व अधिक माहिती करीता** apps.shar.gov.in (https://apps.shar.gov.in) **या संकेत स्थळास भेट द्या.**

**अंतिम दिनांक :-** १४ नोव्हेंबर २०२५

अंतराळ क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्यांसाठी ही उत्तम संधी आहे. इसरोमध्ये काम करणे म्हणजे भारताच्या अंतराळ मोहिमेचा एक भाग बनण्याचा अभिमान मिळवणे. त्यामुळे इच्छुकांनी अर्ज करण्यास विलंब करू नये.

# वैद्यकीय अभ्यासक्रमात बनावट प्रवेशाचा प्रकार उघड!

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/**वैद्यकीय प्रवेशात बनावट कागदपत्रांचा वापर उघड झाला आहे. १५२ विद्यार्थी संशयाच्या भोवऱ्यात आहेत. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष या विद्यार्थ्यांची चौकशी करत आहे. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या वैद्यकीय समुपदेशन परिषदेकडून माहिती मागवण्यात आली आहे. कागदपत्रांची पडताळणी करून पुढील निर्णय घेतला जाईल. या प्रकरणामुळे वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या फेरीतील प्रवेश प्रक्रियेत बनावट कागदपत्रांआधारे प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न झाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले असून, अशा १५२ विद्यार्थ्यांची सखोल तपासणी सुरू झाली आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी कक्ष) या सर्व विद्यार्थ्यांचा तपशील राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या वैद्यकीय समुपदेशन परिषदेकडून (एमसीसी) मागविण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करून पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचे सीईटी कक्षाकडून स्पष्ट करण्यात आले.

**१५२ विद्यार्थ्यांवर तपासाची टांगती तलवार**

महाराष्ट्रातील राज्य कोट्यात परराज्यातील विद्यार्थ्यांनी प्रवेश मिळविल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर, सीईटी कक्षाने प्राथमिक तपासणी केली. या तपासणीत १५२ विद्यार्थ्यांनी चुकीची माहिती देऊन आणि बनावट कागदपत्रे जोडून अर्ज केल्याचे समोर आले. त्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना १६ ऑक्टोबरपर्यंत मूळ आणि अस्सल कागदपत्रे सादर करण्याची मुदत देण्यात आली होती. परंतु या १५२ पैकी केवळ एका विद्यार्थ्यानेच आपली कागदपत्रे सीईटी कक्षाच्या संकेतस्थळावर अपलोड केली असून, त्याची पडताळणी सुरू आहे. उर्वरित १५१ विद्यार्थ्यांकडून कोणताही प्रतिसाद देण्यात आला नाही.

या विद्यार्थ्यांकडून दिलेले ई-मेल आयडी, दूरध्वनी क्रमांक आणि इतर तपशील चुकीचे असल्याचे तपासात आढळले आहे. यातील अनेक ई-मेल आयडी अत्यंत बनावट पद्धतीने तयार करण्यात आल्याचे प्रथमदर्शनी दिसत असल्याचे सीईटी कक्षातील एका वरिष्ठ



अधिकाऱ्याने सांगितले. 'यामागे मोठे रॅकेट असण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबतही स्वतंत्र पडताळणी सुरू आहे,' असेही त्यांनी स्पष्ट केले.

या पार्श्वभूमीवर सीईटी कक्षाने संबंधित विद्यार्थ्यांची सविस्तर माहिती एमसीसीकडे मागविली आहे. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात कोणत्या राज्यातील कोट्यातून प्रवेश अर्ज केला आणि त्यांची कागदपत्रे कोणत्या पद्धतीने पडताळली गेली, याची चौकशी केली जाणार आहे. एमसीसीकडून माहिती मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व निवासी पुराव्यांची सखोल तपासणी केली जाणार असून, त्यानंतरच प्रवेशाबाबत निर्णय घेतला जाईल, असे सीईटी कक्षाकडून सांगण्यात आले.

**विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह –**

या प्रकरणामुळे राज्यातील वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेवरील विश्वासार्हतेचा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे प्रवेश मिळविण्याचा प्रकार पहिल्यांदाच उघड झालेला नसून, यावेळी विद्यार्थ्यांची संख्या आणि त्यामागील यंत्रणा अधिक चिंताजनक असल्याचे सूत्रांनी नमूद केले.

## असिस्टंट प्रोफेसर बनण्यासाठी NET देण्याची गरज नाही!

# असिस्टंट प्रोफेसर पदासाठी महा भरती


NSUT विद्यापीठात NET शिवाय असिस्टंट प्रोफेसर बनण्याची पात्र उमेदवारंनी दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज मागवित आहे.

इच्छुक उमेदवारांनी तत्काळ nsut.ac.in(https://nsut.ac.in) वर जाऊन अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी.अभ्यासक आणि शिक्षक पदासाठी इच्छुक उमेदवारांसाठी आनंदाची बातमी! नेताजी सुभाष यूनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी (NSUT), नवी दिल्ली यांनी असिस्टंट प्रोफेसर आणि असोसिएट प्रोफेसर पदांसाठी नवीन भरती जाहीर केली आहे. या भरतीसाठी अर्ज प्रक्रिया अधिकृत संकेतस्थळ nsut.ac.in(https://nsut.ac.in) वर सुरू झाली आहे. इच्छुक उमेदवारांनी ११ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ऑनलाइन अर्ज भरावा. ऑनलाइन अर्जासोबत त्याची हार्ड कॉपीही विद्यापीठात पाठवावी लागेल.

या भरती मोहिमेद्वारे विद्यापीठातील विविध विभागांमध्ये प्राध्यापकांची नेमणूक होणार आहे. यात इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग / इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन इंजिनिअरिंग या शाखांचा समावेश आहे.या भरतीसाठी उमेदवारांना काही पात्रता करावी लागणार आहे. असिस्टंट प्रोफेसर पदासाठी उमेदवाराकडे संबंधित शाखेत बी.ई./बी.टेक./बी.एस. आणि एम.ई./एम. टेक./एम.एस. पदवी फर्स्ट क्लास किंवा समकक्ष श्रेणीत असणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे, या पदासाठी छएढ परीक्षा किंवा अनुभवाची कोणतीही अट नाही. तर असोसिएट प्रोफेसर पदासाठी संबंधित विषयात पीएच.डी. पदवी, बॅचलर आणि मास्टर्स पदवी तसेच किमान ८ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव आवश्यक आहे, ज्यामध्ये २ वर्षांचा अनुभव पीएच.डी.नंतरचा असावा. तसेच उमेदवाराने किमान ६ संशोधन पेपर्स प्रकाशित केलेले असणे आवश्यक आहे.

अशा प्रकारे करता येईल अर्ज:

nsut.ac.in(https://nsut.ac.in)



या संकेतस्थळाला भेट द्या.

"Recruitment' विभागात जाऊन संबंधित भरतीचा दुवा (link) उघडा.

अर्ज फॉर्ममध्ये सर्व माहिती काळजीपूर्वक भरा.

तुमचा ईमेल आयडी आणि मोबाइल नंबर सक्रिय ठेवा.

आवश्यक कागदपत्रे, फोटो आणि स्वाक्षरी निर्धारित साईझमध्ये अपलोड करा.

अर्ज सबमिट केल्यानंतर त्याची प्रिंटआउट घ्या आणि हार्ड कॉपी विद्यापीठाला पाठवा.

## आमदार शिवाजीराव कर्डिले यांच निधन

**नौकरी एक्सप्रेस**

**अहिल्यनगर/ प्रतिनिधी/**ज्येष्ठ नेते, राहुरीचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे आकस्मिक निधन हे राहुरीसह, अहिल्यानगर जिल्ह्यासाठी आघात आहे, अशी शोकभावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.'आमदार कर्डिले यांच्या निधनामुळे जनसामान्यांशी नाळ जोडलेले, तळागाळातील घटकांच्या विकासासाठी साठी झटणारे नेतृत्व हरपले. ग्रामीण भागाची नाडी माहित असणारे, सहकार चळवळीच्या माध्यमातून



सक्रिय अशा आमदार कर्डिले यांनी राहुरी मतदारसंघ आणि अहिल्यानगरच्या विकासाचा सदैव ध्यास घेतला. याच जोरावर त्यांनी सलगपणे या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणूनही त्यांनी काम केले. त्यांच्या आकस्मिक निधनामुळे राहुरी मतदारसंघातील एक संवेदनशील नेतृत्व हरपले आहे. आमदार संग्राम जगताप यांचे ते सासरे होत. आमदार कर्डिले यांच्या निधनाने कर्डिले आणि जगताप कुटुंबियांवर आघात झाला आहे. या सर्वांच्या दुःखात आम्ही सहभागी असून त्यांना हा आघात सहन करण्याची ताकद मिळावी, अशी ईश्वरचरणी प्रार्थना. ज्येष्ठ नेते आमदार शिवाजीराव कर्डीले यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो असे, मुख्यमंत्री फडणवीस यांनी शोकसंदेशात म्हटले आहे.

# मानवतेचा दीप लावू!

आपण वर्षभर विविध सण साजरे करतो, त्यात दिवाळी सणाला विशेष महत्व आहे कारण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो आपण पाच दिवस साजरा करतो. आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगात दिवाळी उत्साहात साजरी केली जाते म्हणूनच दिवाळीला सणांचा राजा म्हणतात. दिवाळी सारखा उत्साह इतर कोणत्याच सणात नसतो. दिवाळीत लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्याच उत्साहाला उधाण येते म्हणूनच गरीब असो वा श्रीमंत, राज महालात राहणारा राजा असो की झोपडीत राहणारा गोरगरीब प्रत्येक जण दिवाळी सण साजरा करतो. लहान मुलांसाठी तर दिवाळी म्हणजे पर्वणीच असते. शाळेला सुट्टी, नवे कपडे, नव्या वस्तू, किल्ला बनवणे, फटाके उडवणे, मिठाई, फराळ, मामाच्या गावाला जाणे अशा सर्व आवडत्या गोष्टी फक्त दिवाळीत करता येतात. दिवाळी म्हणजे लहान मुलांची चंगळ. केवळ लहान मुलेच नाही तर भावा - बहिणींचा देखील हा आवडता सण कारण दिवाळीतच भाऊबीज हा बहीण - भावांचा आवडता सण येतो. सासरी असलेली बहीण भावाला ओवाळण्यासाठी दिवाळीत आवर्जून माहेरी येते. दिवाळी हा आबालवृद्धांचा आवडता सण.दिवाळी सण म्हणजे प्रकाशाचा सण, दिव्यांचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या काळात आकाशकंदील, पणत्या, रांगोळी, नवी खरेदी, नव्या वस्तू, नवे कपडे, फटाके यांची रेलचेल. आताही या वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. २०२० आणि २०२१ या दोन वर्षात कोरोनाने जगभर धुमाकूळ घातला होता त्यामुळे या दोन वर्षात लोकांना मनासारखी दिवाळी साजरी करता आली नव्हती. मागील दोन वर्षापासून दिवाळीवरील कोरोनाचे सावट नाहीसे झाले मात्र कोरोनामुळे अनेकांचा रोजगार हिरावला गेला त्यामुळे अनेकांनी साधेपणाने दिवाळी साजरी केली. मागील दोन वर्षापासून दिवाळीवर कशाचेही सावट नसल्याने लोकांना दिवाळी मनासारखी साजरी केली. महागाई वाढली असली तरी दिवाळीचा उत्साह कमी झाला नाही उलट वाढतच गेला. दिवाळी हा आनंदाचा, उत्साहाचा आणि प्रसन्नतेचा उत्सव असल्याने हा उत्साह यावर्षीही असाच कायम राहील असे वाटत होते मात्र ऐन दिवाळीच्या आधी झालेल्या अतिवृष्टीने या उत्साहावर पाणी पडले. राज्यातील शेतकऱ्यांवर आसमानी संकट आले. राज्यातील विविध भागात झालेल्या अतिवृष्टीने उभी पिके आडवी झाली. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी हवालदिल झाला. या संकटातून सावरण्याची ताकद शेतकऱ्यांना मिळो आणि त्यांची दिवाळी गोड व्हावी अशी प्रार्थना राज्यातील १३ कोटी जनता देवाजवळ करत आहे. बाहेर प्रकाशाचे दिवे पेटवायचे आणि हृदयातून ज्ञानाचे दिवे प्रज्वलित करायचे. अंतःकरणात अज्ञानाचा, विषमतेचा, अहंकाराचा अंधार असेल तर तो दूर करायच. ज्या प्रमाणे आकाशकंदील, पणत्या लावून बाहेरील अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते तसेच आपल्या अंतःकरणात असलेल्या अवगुणांचा अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते. प्रत्येक मनुष्याने शुभ चिंतन करून, शुभ विचार मनात आणून, शुभ विचार प्रकट करून जीवन प्रगल्भ आणि समृद्ध करावे हाच संदेश दिवाळी देते. जीवनातून आसुरी शक्तीचा पराभव करण्यासाठी दैवी शक्तीचा वापर करावा. मानवाची सर्व धडपड जीवनात सुख आणि आनंद मिळवण्यासाठीच चाललेली असते. दुःख भोगल्याशिवाय सुखाची किंमत कळत नाही हे तत्वज्ञान सांगण्यासाठी ठीक; मात्र दुःखाची अनुभूती घेण्यास कोणालाही आवडत नाही. मनुष्य स्वभावातील हा स्थायीभाव ओळखूनच भारतीय संस्कृतीत सणांची निर्मिती केलेली असावी याचे भान ठेवूनच प्रत्येकाने सण साजरे करावेत.गरीब, कष्टी, दीन, दुबळे, वंचित असा मोठा दुःखी वर्ग समाजात आहे. आपल्या घरी दिवाळी साजरी करताना त्यांच्याही घरी आनंदाचा एक दिवा लावावा म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर देखील आनंदाची रेषा पसरेल.

# अशोका विद्यापीठात २०२६ सत्रासाठी अंडरग्रॅज्युएट प्रवेश सुरू


## ५०० शिष्यवृत्तींची संधी

अशोका विद्यापीठाने २०२६ सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करत ५०० शिष्यवृत्ती जाहीर केल्या आहेत. ही योजना गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक अडथळ्यां शिवाय उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देते.

अशोका विद्यापीठाने २०२६ सत्रासाठी अंडरग्रॅज्युएट अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात केली आहे. या वर्षी विद्यापीठाकडून एकूण ५०० शिष्यवृत्ती दिल्या जाणार आहेत, ज्यामध्ये मेरिट आणि गरज-आधारित अशा दोन्ही प्रकारच्या शिष्यवृत्तींचा समावेश आहे. १३ ऑक्टोबर २०२५ पासून ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून इच्छुक विद्यार्थी रीहेझ्र.शर्वी. ळप या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज करू शकतात. हरियाणातील सोनीपत येथे असलेले अशोका विद्यापीठ हे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शिक्षणासाठी ओळखले जाते. संगणक विज्ञान, निसर्गशास्त्र, सामाजिक विज्ञान आणि मानविकी या क्षेत्रांत आंतरविषयक अभ्यासक्रम राबवून विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासाची संधी देणे हे विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे.

या सत्रातील प्रमुख आकर्षण म्हणजे ५०० शिष्यवृत्तींपैकी २०० मेरिट-आधारित असतील. स्पेशल मेरिट शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत गएए चरळपी, खखडएठ, उचख आणि राष्ट्रीय ऑलिंपियाडमध्ये उच्च गुण मिळवणाऱ्या ५० विद्यार्थ्यांना १००% शिकवणी शुल्क माफी मिळणार आहे. अचिव्हर्स मेरिट शिष्यवृत्ती अंतर्गत बोर्ड परीक्षेत ९८% पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या आणि प्रवेश प्रक्रियेत उत्तम कामगिरी करणाऱ्या १५० विद्यार्थ्यांना देखील १००% पर्यंत सवलत दिली जाईल.

याशिवाय, गरज-आधारित शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कौटुंबिक उत्पन्न, बचत आणि कर्जक्षमता यांच्या आधारे १००% पर्यंत शुल्क माफीची सुविधा दिली जाणार आहे. त्यामुळे योग्य पात्रतेसह परंतु आर्थिक अडचणी असलेले विद्यार्थीही उच्च शिक्षण घेऊ शकतील. अर्ज प्रक्रिया चार टप्प्यांत पार पडणार असून प्रत्येक टप्प्यानंतर निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी जाहीर केली जाईल. अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ मे २०२६ आहे. अर्जदारांना शैक्षणिक पात्रता, प्रवेश परीक्षा आणि वैयक्तिक मुलाखतीच्या आधारे निवडले जाईल.




अशोका प्रवेश मूल्यांकन ही परीक्षा भारतातील एकूण ३७ केंद्रांवर घेतली जाणार आहे. विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त वेळ, सुविधा आणि सहाय्यक साधनांची तरतूदही करण्यात आली आहे. अशोका विद्यापीठ शिक्षणासोबत अनुभवाधारित शिक्षणावर भर देत असून, विद्यार्थ्यांना संशोधन, नेतृत्व आणि सामाजिक जबाबदारी या क्षेत्रात प्रोत्साहन दिले जाते. जगभरातील प्राध्यापक, संशोधक आणि उद्योगतज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळत असल्याने या विद्यापीठातील पदवीधर विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवर करिअरच्या असंख्य संधी उपलब्ध होतात. ही शिष्यवृत्ती योजना गुणवंत, मेहनती आणि पात्र विद्यार्थ्यांना आर्थिक अडथळे दूर करून उच्च शिक्षणाच्या दिशेने वाट मोकळी करून देते. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात संधीची समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न अशोका विद्यापीठ करत आहे.

# गतिमान प्रशासनाचे नवे प्रतिमान: ई-ऑफिस

कधी काळी सरकारी कार्यालयात पाऊल टाकलं की सर्वप्रथम नजरेत भरायचे ते म्हणजे टेबलांवर रचलेले फाईलींचे डोंगर. धूळ, उघडी पानं, आणि त्या सगळ्यांच्या गर्दीत हरवलेले अर्ज- हे दृश्य भारतीय प्रशासनाची ओळख बनले होते. फाईल अजून आली नाही, सही बाकी आहे, प्रकरण मंत्रालयात आहे - अशी उत्तरं नागरिकांनी वर्षानुवर्षे ऐकली. शासनाकडे केवळ हक्कासाठी नव्हे, तर आपली फाईल 'अडकू नये' म्हणूनच लोकांना फेऱ्या माराव्या लागत. या सगळ्याचं कारण साधं होतं, शासनाची प्रणाली पूर्णपणे कागदांवर चालायची. फाईल हातोहात फिरवली जायची. ती कुठे हरवली, कोणाकडे अडकली हे शोधणं म्हणजे गवताच्या गंजीत सुई शोधण्यासारखं काम होतं. परंतु, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या चाणाक्ष नजरेने ही बाब हेरली आणि १५० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणांच्या कामात प्रत्येक विभाग आणि कार्यालयाला ई-ऑफिस प्रणालीवर येणे अनिवार्य केले. बघता बघता नंदुरबार सारख्या आदिवासी बहुल जिल्ह्यात एक नाही तर तब्बल ३४ कार्यालये आजतागायत ई-ऑफिस प्रणालीवर आली आहेत.

### ई-ऑफिसचा जन्म


२००० च्या दशकात सरकारने ठरवलं की बदल आवश्यक आहे. देश माहिती तंत्रज्ञानाच्या युगात प्रवेश करत होता. तेव्हा 'ई-गव्हर्नन्स' ही संकल्पना पुढे आली. शासनाच्या प्रत्येक कामकाजात डिजिटल तंत्रज्ञान आणण्याचा प्रयत्न सुरु झाला. राष्ट्रीय माहिती केंद्राने (छखउ) या संकल्पनेला प्रत्यक्ष रूप दिलं आणि ई-ऑफिस प्रणाली विकसित केली. कल्पना साधी पण क्रांतिकारक होती-कागदाऐवजी संगणक, हस्ताक्षराऐवजी डिजिटल सही, आणि फाईलऐवजी ऑनलाईन व्यवस्थापन. या प्रणालीत प्रत्येक अर्ज, पत्र किंवा प्रस्ताव डिजिटल स्वरूपात तयार होतो. त्यावर अधिकाऱ्यांची टिपणी, आदेश आणि निर्णय थेट ऑनलाइन नोंदवले जातात. फाईल कुठे आहे? हा प्रश्न कायमचा संपतो.

### बदलाची पहिली पाऊले

सुरुवतीला सर्व काही सोपं नव्हतं. अनेक कर्मचाऱ्यांना संगणकाची सवय नव्हती. की-बोर्डवर टायपिंग करणे अवघड वाटत होते. कागदावर काम करण्याची मानसिकता खोलवर रुजलेली होती. पण जसजसा अनुभव वाढला, तसतसे वातावरण बदलू लागले. पहिल्या काही फाईली वेळेत पूर्ण झाल्या, काही अर्ज अपेक्षेपेक्षा जलद मंजूर झाले. लोकांना जाणवलं की ई-ऑफिस ही केवळ तांत्रिक प्रणाली नाही, तर कामकाजाच्या संस्कृतीतला बदल आहे. कागदावरील अवलंबित्व कमी झालं, खर्च घटला, आणि निर्णय प्रक्रियेला वेग आला. अधिकाऱ्यांना कामावर अधिक नियंत्रण मिळालं, आणि नागरिकांना वेळेवर प्रतिसाद मिळू लागला.

### नंदुरबारचा डिजिटल प्रवास

महाराष्ट्रातील नंदुरबार हा आदिवासीबहुल, डोंगराळ आणि दुर्गम जिल्हा. इथल्या नागरिकांसाठी प्रशासनाची दारे नेहमीच थोडी दूर वाटायची. अर्ज दिल्यानंतर तो पुढे गेला का, कुणाकडे गेला, मंजुरी कधी मिळेल हे समजणं अवघड असायचं. पण काही वर्षांपूर्वी जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात ई-ऑफिसची अंमलबजावणी झाली. प्रशिक्षण देण्यात आलं, नेटवर्क सुधारण्यात आलं, आणि प्रत्येक विभागाला या प्रणालीशी जोडण्यात आलं. आज जिल्हाधिकारी कार्यालयात आलेला अर्ज थेट संगणकावर नोंदवला



जातो. त्याची स्कॅन प्रत प्रणालीवर अपलोड होते, संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठवली जाते आणि त्याची स्थिती रिअल-टाईममध्ये दिसते. नागरिकाला अर्जाचा क्रमांक मिळतो, ज्याद्वारे तो ऑनलाईन त्याचा मागोवा घेऊ शकतो.

### एका शेतकऱ्याचा अनुभव

अक्कलकुवा तालुक्यातील रमेश पावरा हे छोटे शेतकरी त्यांना जमिनीच्या नोंदणीसाठी अर्ज करायचा होता. पूर्वी, ते अनेकदा तहसील कार्यालयात गेले, पण प्रत्येक वेळी नवीन कारण मिळायचं फाईल हरवली आहे, सही बाकी आहे, अजून पुढे गेली नाही. यंदा त्यांनी अर्ज दिला आणि तो ई-ऑफिसवर टाकला गेला. दोन दिवसांनी गावातील कॉमन सर्व्हिस सेंटरवरून त्यांनी लॉगिन करून पाहिलं, फाईल तहसीलदारांकडे पोहोचली होती. आणखी काही दिवसांत मंजुरीही मिळाली. त्यांच्या डोळ्यांत समाधान होतं. ते म्हणाले, पूर्वी माझा अर्ज लालफितीच्या डोंगरात अडकायचा, आता तो बुलेट ट्रेनच्या गतीने पुढे जातो. ही केवळ रमेशची यांची कथा नाही, ती नंदुरबारच्या नव्या गतिमान प्रशासनाची ओळख आहे.

### कामकाजातील बदल

ई-ऑफिसमुळे महसूल, आरोग्य आणि शिक्षण या तिन्ही प्रमुख विभागांत गती आली आहे. महसूल विभागात नामांतरण, वारसा आणि जमिनीच्या नोंदी आता काही दिवसांत पूर्ण होतात. पूर्वी हेच काम महिनोमहिने अडकायचं. जिल्हा सामान्य रुग्णालयातील औषध खरेदीचे प्रस्ताव, डॉक्टरांच्या नियुक्तीची कागदपत्रं आणि शासकीय पत्रव्यवहार सर्व आता ई-ऑफिसवरूनच प्रक्रिया होतात. मंजुरीसाठी लागणारा वेळ निम्म्यावर आला आहे. शिक्षण विभागात शाळांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव, शिक्षक बदल्यांचे अर्ज, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती सर्वकाही डिजिटल झालं आहे. शाळांना निधी वेळेत मिळतो आणि विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती विलंब न होता मिळते.

### दुर्गम भागातील डिजिटल पहाट

नंदुरबारचा भूगोल कठीण आहे. धडगाव, शहादा आणि अक्कलकुवा यांसारख्या तालुक्यांतील अनेक पाडे अजूनही डोंगरमाथ्यावर वसलेले आहेत. इथे वीजपुरवठा आणि नेटवर्क या दोन्ही अडचणी कायम आहेत. प्रशासनाने या अडचणींवर उपाय शोधत प्रत्येक कार्यालयाला ई-ऑफिसशी जोडण्याचं काम केलं. अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिलं, तांत्रिक सुविधा निर्माण केल्या आणि कर्मचारीवर्गाला बदलासाठी तयार केलं. आज डोंगराच्या पायथ्याशी राहणारा शेतकरी आपला अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचताना पाहतो. त्याच्यासाठी हा केवळ तांत्रिक बदल नाही, तर लोकशाहीचा नवा अनुभव आहे.

### पारदर्शकता आणि जबाबदारी

ई-ऑफिसचं सर्वात मोठं यश म्हणजे पारदर्शकता. फाईल कुठे आहे, कोणाकडे आहे, किती दिवसांपासून आहे, हे सर्व प्रणालीवर स्पष्ट दिसतं. त्यामुळे जबाबदारी ठरते आणि भ्रष्टाचाराला आळा बसतो. पूर्वी फाईल हरवली की दोष ठरवणं कठीण होतं.आता प्रणाली स्वतःच नोंदी ठेवते. यामुळे प्रशासन अधिक जबाबदार आणि नागरिकांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. जिल्हा प्रशासनाने 'कागदविरहित कार्यालय' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. कागदांचा वापर घटला आहे, छपाईचा खर्च कमी झाला आहे आणि पर्यावरणालाही फायदा झाला आहे.

### नागरिकांच्या जीवनातील बदल

ई-ऑफिसचा परिणाम केवळ कार्यालयांपुरता मर्यादित राहिला नाही, तो थेट नागरिकांच्या जीवनात दिसतो. पेन्शनधारक वृद्धांना त्यांचा अर्ज वेळेत मंजूर होतो. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळेवर मिळते. शेतकऱ्यांना पिकविम्याचे पैसे योग्य वेळी मिळतात. फाईल हरवली हे वाक्य आता इतिहास झाले आहे. लोक हसून म्हणतात, फाईल पुढे गेली आहे. हा बदल शांत आहे, पण प्रभावी आहे.

### आव्हाने आणि शिकलेले धडे

ई-ऑफिसचा प्रवास सहज नव्हता. काही कर्मचाऱ्यांना नव्या प्रणालीबद्दल भीती वाटली. तांत्रिक त्रुटी आल्या, इंटरनेट मंद होतं, काही ठिकाणी वीज पुरवठा खंडित होत असे. पण, प्रशासनाने सातत्य आणि संयम ठेवला. कर्मचाऱ्यांना वारंवार प्रशिक्षण दिलं, अडचणी समजून घेतल्या आणि त्यावर एकत्रित उपाय शोधले. काही वर्षांतच सर्व कार्यालयांनी या प्रणालीला स्वीकारलं. या अनुभवाने दाखवून दिलं की इच्छाशक्ती असेल, तर कोणताही बदल शक्य आहे. आणि जेव्हा त्या बदलाच्या मागे नागरिकांचा विश्वास असतो, तेव्हा तो टिकून राहतो.

### नव्या युगाची सुरुवात

ई-ऑफिस ही फक्त प्रणाली नाही, ती शासन आणि नागरिक यांच्यातील दुवा आहे.ती वेळ वाचवते, खर्च कमी करते आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे विश्वास निर्माण करते. नंदुरबार जिल्ह्याने हा प्रयोग यशस्वीपणे राबवला आहे. आज प्रत्येक विभागात कामकाज गतीमान झालं आहे. अधिकाऱ्यांना निर्णय घेण्यासाठी आवश्यक माहिती सहज उपलब्ध होते. नागरिकांनाही आपल्या प्रकरणाची स्थिती जाणून घेणं सोपं झालं आहे. प्रशासन आता केवळ फाईलींचं नाही, तर लोकांच्या अपेक्षांचं प्रशासन बनलं आहे.

### ई-ऑफिसचा पुढचा अध्याय

ई-ऑफिसचा प्रवास फक्त नंदुरबारपुरता नाही. तो त्या महाराष्ट्राचा आरसा आहे जो हळूहळू कागदांवरून स्क्रीनवर जात आहे. राज्य सरकारने पेपरलेस सचिवालय हे ध्येय ठेवलं आहे, आणि जिल्ह्यांची कामगिरी त्या दिशेने आशादायक आहे. पुढील काही वर्षांत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा विश्लेषण यांचा वापर ई-ऑफिसमध्ये वाढेल. फाईल फक्त डिजिटल न राहता स्मार्ट बनेल ती स्वतः पुढचा टप्पा ओळखेल, निर्णयप्रक्रियेत मदत करेल, आणि विलंब झाल्यास स्वयंचलित सूचना देईल. नंदुरबारसारख्या जिल्ह्यांनी या बदलाचं नेतृत्व केलं तर ग्रामीण भारताचं प्रशासनही डिजिटल युगात उभं राहील.

### नवी कार्यसंस्कृती

ई-ऑफिस ही केवळ सॉफ्टवेअर प्रणाली नाही, तर एक नवी कार्यसंस्कृती आहे जबाबदारी, पारदर्शकता आणि वेळेच्या मूल्याची संस्कृती. या प्रणालीने प्रशासनातील मानवी संवेदनांना नवी उंची दिली आहे. जेव्हा एखाद्या वृद्धाला पेन्शन वेळेत मिळते, तेव्हा ती फक्त फाईल पूर्ण झाल्याची नोंद नसते, तर त्याच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान प्रशासनाच्या मानवतेचं प्रतीक असतं.

ई-ऑफिस प्रणालीचा प्रवास म्हणजे कागदांच्या ढिगाऱ्यांमधून डिजिटल प्रकाशाकडे नेणारी वाट. तो प्रवास फक्त तांत्रिक बदलांचा नाही, तर लोकशाहीला नवा श्वास देणारा आहे. नंदुरबारचा अनुभव सांगतो की तंत्रज्ञान हे कुणाची मक्तेदारी नाही; ते डोंगर, पाडे आणि शेतीमध्येही तितक्याच ताकदीने रुजू शकतं.

आज फाईल हरवली हे वाक्य इतिहास आहे, आणि फाईल एका क्लिकवर ही वास्तवाची नवी ओळख. कदाचित काही वर्षांनी आपण मागे वळून पाहू तेव्हा लक्षात येईल की, ई-ऑफिस ही केवळ संगणक प्रणाली नव्हती तर ती भारताच्या लोकशाहीच्या नव्या अध्यायाचं पहिलं पान होती.

**- रणजितसिंह राजपूत,**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**नंदुरबार**

# मध्यस्थी : वाद मिटविण्याचा सौहार्दपूर्ण मार्ग




वाद हे मानवी समाजातील अपरिहार्य वास्तव आहे, पण त्याचे समाधान सौहार्दपूर्ण पद्धतीने करणे ही खरी प्रगती आहे. हाच विचार लक्षात घेऊन भारत सरकारने मध्यस्थता कायदा, १९२३ लागू केला. या कायद्याचा उद्देश म्हणजे मध्यस्थीद्वारे वाद सोडवण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करणे, मध्यस्थी करारांची अंमलबजावणी सुनिश्चित करणे, मध्यस्थांची नोंदणीसाठी संस्था उभी करणे तसेच सामुदायिक आणि ऑनलाइन मध्यस्थीला प्रोत्साहन देणे हा आहे.

मध्यस्थीची पार्श्वभूमी आणि कायदेशीर आधार

मध्यस्थीची कल्पना नवीन नसून लवाद आणि सामंजस्य कायदा १९९६ तसेच कायदेशीर सेवा प्राधिकरण कायदा १९८७ या कायद्यांनी या प्रक्रियेला मजबूत कायदेशीर पाया दिला. विशेषतः लोक अदालतची स्थापना ही न्यायालयीन व्यवस्थेबाहेर समझोत्याने वाद सोडवण्याच्या संकल्पनेला चालना देणारी ठरली. न्यायालयांतील वाढती खटले व त्यासाठी लागणारा वेळ लक्षात घेता वैकल्पिक वाद निराकरण ही संकल्पना उदयास आली.

### वैकल्पिक वाद निराकरणाची (ADR) संकल्पना

ADR म्हणजे पारंपरिक न्यायालयीन प्रक्रियेऐवजी जलद, सोपी आणि कमी खर्चिक उपाय देणारी प्रणाली. यात लवाद (-ीलळीींरींळेप), सामंजस्य (उेपलळश्रळरींळेप) आणि मध्यस्थी (चशवळरींळेप) या पद्धतींचा समावेश होतो. मध्यस्थी ही त्यातील सर्वाधिक लोकप्रिय आणि प्रभावी पद्धत मानली जाते.

### मध्यस्थी म्हणजे काय?

मध्यस्थी ही एक स्वेच्छेची, गोपनीय आणि लवचिक प्रक्रिया आहे, ज्यात निष्पक्ष तृतीय पक्ष म्हणजे मध्यस्थ दोन्ही पक्षांना संवाद आणि समजुतीच्या माध्यमातून समाधानकारक तोडगा काढण्यास मदत करतो. न्यायालयीन प्रक्रियेपेक्षा ही अधिक वेगवान, कमी खर्चिक आणि संबंध जपणारी असते.

### मध्यस्थीचे फायदे

न्यायालयीन खटल्यांच्या तुलनेत वाद लवकर निकाली निघतात, खर्च कमी आणि प्रक्रिया सोपी असते. वादग्रस्त पक्षांची गोपनीयता राखली जाते तसेच निकालावर दोन्ही पक्षांचा प्रत्यक्ष सहभाग आणि नियंत्रण असते.

वैयक्तिक, व्यावसायिक आणि सामाजिक नाती टिकवण्यासाठी मध्यस्थी उपयुक्त ठरते. प्रत्येक नागरिकाला वाद सोडवण्याचा सुलभ मार्ग उपलब्ध होतो, न्यायालयांवरील ताण कमी होतो आणि न्यायालयीन निकालांपेक्षा अधिक सर्जनशील उपाय सापडतात.

### मध्यस्थीसाठी योग्य वादप्रकार

मध्यस्थीचा उपयोग कौटुंबिक वाद (घटस्फोट, मुलांची देखरेख, वारसा), व्यावसायिक वाद (करार, व्यवहार, भागीदारीतील मतभेद), शेजारी वाद (मालमत्ता, आवाजासंबंधी तक्रारी), कामगार वाद (कर्मचारी-नियोक्ता मतभेद) आणि ग्राहक तक्रारी (वस्तू किंवा सेवांशी संबंधित वाद) अशा विविध क्षेत्रांत केला जातो.

### मध्यस्थीची प्रक्रिया

मध्यस्थ प्रथम प्रक्रिया समजावतो, नंतर दोन्ही पक्ष आपली मते मांडतात. त्यानंतर एकत्र किंवा स्वतंत्रपणे मध्यस्थाशी चर्चा होते. मध्यस्थ परस्पर समजुतीने हिताचा विचार करून तोडगा सुचवतो आणि शेवटी दोन्ही पक्षांच्या सहमतीने लेखी करारावर स्वाक्षऱ्या घेतल्या जातात.

### मध्यस्थाची भूमिका

मध्यस्थ निष्पक्ष, तटस्थ आणि संवाद सुलभ करणारा असतो. तो प्रशिक्षित व्यावसायिक म्हणून वाद व्यवस्थापन आणि संवाद कौशल्याचा वापर करतो. त्याचा उद्देश कोणत्याही पक्षाचा पक्षपात न करता दोन्ही पक्षांना तोडग्याच्या दिशेने नेणे हा असतो.

मध्यस्थी : शांततामय समाजाची पायाभरणी

भारतामध्ये मध्यस्थीबाबत जागरूकता झपाट्याने वाढत आहे. राष्ट्रीय लोक अदालतींमधून हजारो प्रकरणे मैत्रीपूर्ण पद्धतीने सोडवली गेली आहेत. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणे जनतेला मोफत कायदेशीर मदत पुरवून मध्यस्थीला प्रोत्साहन देतात. त्यामुळे सर्वांसाठी न्याय ही संकल्पना प्रत्यक्षात उतरते आणि समाजात सौहार्द वृद्धिंगत होते.

### पुण्यातील यशस्वी मध्यस्थी उपक्रम

पुण्यात मध्यस्थीद्वारे वाद सौहार्दपूर्ण पद्धतीने सोडवण्याच्या प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे. नुकत्याच पार पडलेल्या 'मेडिएशन फॉर द नेशन ड्राइव्ह' या उपक्रमात तब्बल १,९२२ प्रकरणे मध्यस्थीद्वारे समाधानकारक रित्या निकाली निघाली. या मोहिमेमुळे वैकल्पिक वाद निराकरण यंत्रणांचे वाढते महत्त्व अधोरेखित झाले आहे.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण महेंद्र के. महाजन म्हणतात, मध्यस्थी ही संघर्षांना सकारात्मक पद्धतीने सोडवण्याची दिशा देते. ती नातेसंबंध जपत समाजात सौहार्द वाढवते. पुण्यात मध्यस्थीला अधिक बळकटी देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

सदस्य सचिव सोनल पाटील म्हणतात, मध्यस्थीद्वारे आम्ही पक्षकारांना परस्परसंमतीने समाधानकारक तोडगे शोधण्यासाठी सक्षम करतो. ही सर्वांपर्यंत न्याय पोहोचवण्याची आणि समाजात समेट व ऐक्य प्रस्थापित करण्याची प्रक्रिया आहे.

पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या या यशस्वी उपक्रमामुळे मध्यस्थीला नवा वेग मिळाला आहे. मध्यस्थी ही केवळ वाद सोडवण्याची पद्धत नाही, तर ती संवाद, समजूत आणि सौहार्द यांचा सेतू आहे. या प्रयत्नांनी समाजात शांततेचा आणि न्यायाचा संदेश दिला आहे.

**- जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

# RITES मध्ये वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक पदासाठी भरती

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/ राईट्स लिमिटेडमध्ये वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक पदांसाठी ६०० जागांवर भरती प्रक्रिया सुरू असून अर्जाची अंतिम दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ पर्यंत आहे. पात्र उमेदवार** rites.com (https://rites.com) **वरून ऑनलाईन अर्ज करू शकतात.**

राईट्स लिमिटेड तर्फे वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक या पदांसाठी मोठी भरती जाहीर करण्यात आली आहे. या भरतीअंतर्गत एकूण ६०० पदांवर नियुक्ती केली जाणार असून इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी १२ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ठखढएड च्या अधिकृत संकेतस्थळावर rites.com (https://rites.com) माध्यमातून ऑनलाईन अर्ज करावा. उमेदवारांना शैक्षणिक पात्रता म्हणून सिव्हिल, इलेक्ट्रिकल, एस अँड टी, मेकॅनिकल, केमिकल या शाखांमध्ये पूर्णवेळ डिप्लोमा असणे आवश्यक आहे. रसायनशास्त्र विषयासाठी पूर्णवेळ बी.एससी. पदवी आवश्यक आहे. संबंधित विषयात उच्च पात्रता (डिग्री किंवा पदव्युत्तर पदवी) असलेले उमेदवारही अर्ज करू शकतात.

तसेच उमेदवारांकडे संबंधित क्षेत्रात किमान २ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे. प्रशिक्षण, इंटर्नशिप, अध्यापन किंवा संशोधन फेलोशिपचा अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही. एका ठराविक गुनशाखेत बसणाऱ्या उमेदवारांना अर्ज करता येणार आहे. ही गुनशाखा आरक्षित वर्गानुसार विभागली गेली आहे. पाहिले तर सामान्य, ईडब्ल्यूएस आणि ओबीसी (NCL) उमेदवारांसाठी किमान ५०% गुण आवश्यक आहे. एससी/एसटी आणि आपंग उमेदवारांसाठी किमान ४५% गुण आवश्यक आहे.या पदासाठी उमेदवाराचे वय कमाल ४० वर्षे निश्चित करण्यात आले आहे. सरकारच्या नियमानुसार ओबीसी, एससी, एसटी, दिव्यांग, माजी सैनिक आणि जम्मू-काश्मीर रहिवासी उमेदवारांना वयोमर्यादेत सवलत मिळेल.




विशेषतः अपंग उमेदवारांना १० वर्षांची अतिरिक्त सूट देण्यात येईल.

उमेदवारांना अर्ज शुल्क भरावे लागणार आहेत. सामान्य आणि ओबीसी उमेदवारांसाठी शुल्क ३०० + लागू कर आयोजित करण्यात आले आहे तर ईडब्ल्यूएस, एससी, एसटी आणि झुऊ उमेदवारांसाठी शुल्क १०० + लागू कर निश्चित करण्यात आले आहे. विशेष नोंद: अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि दिव्यांग उमेदवारांना, जर त्यांनी पुढील टप्प्यातील परीक्षा (जसे की लेखी परीक्षा) दिली, तर त्यांचे शुल्क परत केले जाईल.

LIC AAO **पदासाठी अर्ज केलात? प्रिलिम्स परीक्षेचा निकाल जाहीर लवकरच**

इच्छुक उमेदवारांनी पात्रतेच्या सर्व अटी काळजीपूर्वक वाचून नियोजित अंतिम तारखेपूर्वी अर्ज सादर करावा. भरतीशी संबंधित सर्व ताज्या माहितीसाठी ठखढएड च्या अधिकृत संकेतस्थळाला नियमित भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो.

# मुंबई पोर्ट प्राधिकरण भरती

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/मुंबई पोर्ट प्राधिकरणामध्ये ग्रॅज्युएट अप्रेंटिस आणि COPA पदांसाठी एकूण ११६ जागांसाठी भरती जाहीर झाली आहे.अर्ज करण्याची अतिम दिनांक १० नोव्हेंबर २०२५ असून, अर्ज ऑफलाइन पद्धतीने भरावा लागणार आहे.

जर तुम्हाला पोर्टवर काम करण्याची इच्छा आहे पण अनुभव नसल्यामुळे संधी मिळत नसेल, तर तुमच्यासाठी चांगली बातमी आहे. मुंबई पोर्ट प्राधिकरणाने (Mumbai Port authority) ग्रॅज्युएट अप्रेंटिस आणि कंप्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट (COPA) पदांसाठी अप्रेंटिस भरती जाहीर केली आहे. या भरतीसाठी अर्ज प्रक्रिया ऑफलाइन पद्धतीने केली जाणार असून, अर्ज पाठवण्याची अतिंम दिनांक १० नोव्हेंबर २०२५ आहे.




**१२ महिन्यांसाठी प्रशिक्षणार्थी म्हणून करता येईल काम**

मुंबई पोर्ट प्राधिकरणाने अप्रेन्टिस पदासाठी ही भरती जाहीर केली आहे. या भरतीच्या माध्यमातून एकूण ११६ जागा भरण्यात येणार आहेत. मुळात, ग्रॅज्युएट उमेदवारांसाठी ११ जागा राखीव आहेत तर COPA उमेदवारांसाठी १०५ जागा राखीव आहेत. अर्ज करण्यासाठी अधिकृत संकेतस्थळ mumbaiport.gov.in (https://mumbaiport.gov.in) ला भेट द्या. अर्जाची शेवटची तारीख १० नोव्हेंबर २०२५ निश्चित करण्यात आली आहे.

**शैक्षणिक पात्रता -** उमेदवार १०वी पास/ पदवीधर असणे आवश्यक आहे.

**पुढील वृत्त पान नं.४ वर...**

# 'रेल इंडिया टेक्निकल अँड इकोनॉमिक सर्व्हिस'मध्ये ६०० जागांची मेगाभरती

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** रेल इंडिया टेक्निकल अँड इकोनॉमिक सर्व्हिसने (RITES) २०२५ मध्ये वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक पदांसाठी ६०० जागांची भरती जाहीर केली आहे. १४ ऑक्टोबर ते १२ नोव्हेंबर २०२५ पर्यंत अर्ज करता येईल. पात्र उमेदवारांना ITI/B.E/B.Tech शिक्षण आणि २ वर्षांचा अनुभव आवश्यक आहे. निवड प्रक्रिया लेखी परीक्षा आणि दस्तऐवज पडताळणीवर आधारित असेल.

रेल इंडिया टेक्निकल अँड इकोनॉमिक सर्व्हिसने वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक पदांसाठी २०२५ मध्ये ६०० जागांसाठी भरती जाहीर केली आहे. या पदांसाठी अर्ज प्रक्रिया १४ ऑक्टोबर २०२५ पासून सुरू झाली असून ती १२ नोव्हेंबर २०२५ पर्यंत चालेल. पात्र उमेदवारांना अधिकृत वेबसाइटद्वारे अर्ज करता येईल. या भरतीमध्ये पात्रता, एकूण रिक्त जागा, वयोमर्यादा, शैक्षणिक पात्रता, वेतन, अर्ज प्रक्रिया, परीक्षा पद्धती, शुल्क आणि इतर महत्त्वाचे तपशील समाविष्ट आहेत.

रेल इंडिया टेक्निकल अँड इकोनॉमिक सर्व्हिस अधिसूचना २०२५ अधिकृत वेबसाइटवर प्रसिद्ध झाली आहे. यामध्ये वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक पदांसाठी मोठ्या प्रमाणात भरतीची घोषणा करण्यात आली आहे. या भरतीमुळे अभियांत्रिकी क्षेत्रातील अनुभवी व्यावसायिकांना नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी संपूर्ण अधिसूचना वाचावी.

**पदांची नावे:** वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक

रिक्त जागांची संख्या: ६००

अर्ज करण्याची अंतिम दिनांक: १२ नोव्हेंबर २०२५

**परीक्षेची दिनांक:** २३ नोव्हेंबर २०२५

**पात्रता:** ITI/B.E/B.Tech. पास असावा.

वयोमर्यादा: ४० वर्षे

**अर्ज फिस:** रु. ३००/- सामान्य/ ओबीसी आणि रु. १००/- एथड/एससी/ एसअी/अपंग यानां राहील.

**वेतन:** रु. २९,७३५

**निवड पद्धत:** संगणक-आधारित चाचणी

ऑनलाईन अर्ज व अधिक माहिती करीता https://www.rites.com/ Career या संकेत स्थळास भेट द्या.

**पात्रता -** अर्ज सादर करण्यापूर्वी तुम्ही सर्व पात्रता निकष पूर्ण करत असल्याची खात्री करणे महत्त्वाचे आहे. आवश्यकता स्पष्टपणे समजून घेण्यासाठी, आम्ही खालील



तक्त्यामध्ये आवश्यक निकष नमूद केले आहेत.अर्ज प्रक्रियेसह पुढे जाण्यापूर्वी तुमची पात्रता निश्चित करण्यासाठी या अटी काळजीपूर्वक वाचा.

पदाचे नाव । शैक्षणिक पात्रता । अनुभव । वयोमर्यादा -

वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक (स्थापत्य) या पदासयाठी स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये पदविका पास असावा.सदरील पदासाठी वय ४० वर्षे असावे.

वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक (विद्युत) यास या पदासयाठी विद्युत/ विद्युत आणि इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीमध्ये पदविका पास असावा. सदरील पदासाठी वय ४० वर्षे असावे.

वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक (ST) या पदासयाठी इन्स्ट्रुमेंटेशन/ इन्स्ट्रुमेंटेशन आणि कंट्रोल/ इलेक्ट्रॉनिक्स आणि इन्स्ट्रुमेंटेशन/ इलेक्ट्रिकल आणि इन्स्ट्रुमेंटेशन/ इलेक्ट्रॉनिक्स/ इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीमध्ये पदविका पास असावा.सदरील पदासाठी वय ४० वर्षे असावे.

वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक (यांत्रिकी) या पदासयाठी यांत्रिकी/ उत्पादन/ उत्पादन आणि औद्योगिक/ उत्पादन/ यांत्रिकी आणि ऑटोमोबाईल अभियांत्रिकीमध्ये पदविका पास असावा.सदरील पदासाठी वय ४० वर्षे असावे.

वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक (धातुकर्म) या पदासयाठी धातुकर्म अभियांत्रिकीमध्ये पदविका पास असावा.सदरील पदासाठी वय ४० वर्षे असावे.

वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक (रासायनिक) या पदासयाठी रासायनिक/ पेट्रोकेमिकल/ रासायनिक तंत्रज्ञान/ पेट्रोकेमिकल तंत्रज्ञान/ प्लास्टिक अभियांत्रिकी तंत्रज्ञान/ अन्न/ वस्त्र/ चर्म तंत्रज्ञान यामध्ये पदविका पास असावा. सदरील पदासाठी वय ४० वर्षे असावे.

वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक (रसायनशास्त्र) या पदासयाठीरसायनशास्त्रामध्ये B.Sc. पास असावा.सदरील पदासाठी वय ४० वर्षे असावे.

**वेतन -** अंतिम निवड झाल्यानंतर, उमेदवारांना त्यांच्या विशिष्ट भूमिका आणि जबाबदाऱ्यांनुसार स्पर्धात्मक वेतन मिळेल. यामुळे निवडलेल्या सर्व उमेदवारांना संस्थेतील त्यांच्या योगदानाबद्दल योग्य मोबदला मिळेल याची खात्री होते.

**निवड पद्धत -** रेल इंडिया टेक्निकल अँड इकोनॉमिक सर्व्हिसमधील वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक पदासाठी निवड प्रक्रियेमध्ये दोन भिन्न टप्पे असतील. पदासाठी पात्र मानले जाण्यासाठी उमेदवारांनी दोन्ही फेऱ्या यशस्वीरित्या पार करणे आवश्यक आहे.

विविध पदांसाठी पात्र होण्यासाठी उमेदवारांनी लेखी परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. ठखढएड वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक भरती २०२५ निवड प्रक्रियेमध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे:

१. लेखी परीक्षा
२. दस्तऐवज पडताळणी

# ५० हजार नोकरदारांना लवकरच मिळणार नारळ?

देशातील आयटी क्षेत्र मोठ्या प्रमाणात नोकर कपात करत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. एका अंदाजानुसार, या वर्षाच्या अखेरीस ५० हजाराहून अधिक कर्मचाऱ्यांना त्यांच्या नोकऱ्या गमवाव्या लागू शकतात.

देशातील आयटी क्षेत्र मोठ्या प्रमाणात नोकर कपात करत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. एका अंदाजानुसार, या वर्षाच्या अखेरीस ५० हजाराहून अधिक कर्मचाऱ्यांना त्यांच्या नोकऱ्या गमवाव्या लागू शकतात. ही संख्या आणखी आखली आहे, जे त्यांच्या एकूण कर्मचाऱ्यांच्या २ टक्के आहे. दरम्यान, एक्सेंचरने जून ते ऑगस्ट दरम्यान जगभरात ११००० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले आहे.

यावर्षी अनेक मोठ्या कंपन्यांनी शांतपणे लोकांना कामावरुन काढून टाकले आहे. वर्षाच्या अखेरीस टाळेबंदीमुळे प्रभावित झालेल्या आयटी व्यावसायिकांची संख्या ५५ हजार ते ६० हजारपर्यंत वाढू शकते. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) या युगात, कंपन्या कर्मचाऱ्यांना काढून टाकत आहेत




वाढण्याची शक्यता देखील वर्तवली जातेय. एका अहवालानुसार २०२३ ते २०२४ दरम्यान अंदाजे २५००० लोकांनी त्यांच्या नोकऱ्या गमावल्या. या वर्षीही संख्या दुप्पट होऊ शकते. कंपन्या त्यांचे कर्मचारी कमी करण्यासाठी विविध युक्त्या वापरत आहेत, जसे की खराब कामगिरीचे कारण देत काढून टाकणे, पदोन्नतीत विलंब करणे किंवा स्वेच्छेने राजीनामा मागणे.

**अधिक लोकांना कामावरून काढून टाकले जाणार**

अलीकडेच, टीसीएस आणि एक्सेंचर सारख्या प्रमुख आयटी कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात कामावरून काढून टाकण्याची घोषणा केली आहे. शिवाय, टीसीएसने मार्च २०२६ पर्यंत सुमारे १२००० अधिक कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्याची योजना आणि कामासाठी तंत्रज्ञानाकडे वळत आहेत.

का टाळेबंदी होत आहे?


भारतातील कंपन्या एआय परिवर्तनाशी जुळवून घेत आहेत. कामाच्या पद्धती बदलत आहेत. एआय स्वीकारणे हे केवळ खर्च कमी करण्याचा उपाय नाही तर ते एक धोरणात्मक बदल देखील आहे. याव्यतिरिक्त, टाळेबंदीची इतर अनेक कारणे आहेत, जसे की भू-राजकीय तणाव, यूएस इमिग्रेशन धोरणे, वाढत्या एच-१ बी खर्च आणि बरेच काही. टाईम्स ऑफ इंडियाच्या अहवालानुसार, क्लाउड कॉम्प्युटिंग, डेटा ॲनालिटिक्स, एआय आणि डिजिटल ट्रान्सफॉर्मेशनमध्ये विशेषज्ञ असलेल्या कंपन्या या बदलाशी अधिक यशस्वीरित्या जुळवून घेत आहेत, तर पारंपारिक आउटसोर्सिंग कंपन्यांना सर्वात जास्त व्यत्यय येत आहे.

# JEE 2026 ची तयारी करताय?

JEE Main २०२६ **मध्ये यश मिळवण्यासाठी टाइम टेबल, पुरेशी झोप आणि योग्य स्टडी मटेरियल** (NCERT) **वापरणे महत्त्वाचे आहे.**

JEE Main हा देशातील सर्वात स्पर्धात्मक इंजिनिअरिंग प्रवेश परीक्षांपैकी एक आहे. IIT, NIT किंवा IIIT सारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी लाखो विद्यार्थी दरवर्षी ही परीक्षा देतात. पण यश फक्त मेहनतीने

**मग अभ्यास करण्याची ही टेक्निक लक्षात घ्या**




नाही, तर योग्य स्ट्रॅटेजी आणि प्लॅनिंगने मिळते. जर तुम्ही गएए २०२६ ची तयारी करत असाल, तर खाली दिलेल्या काही टिप्स तुमच्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतील.

अभ्यासात सातत्य राखण्यासाठी टाइम टेबल अत्यावश्यक आहे. दिवसाचे प्रत्येक तास नियोजनबद्ध पद्धतीने विभागा. सकाळचा वेळ अवघड विषयांसाठी ठेवा आणि रात्रीचा वेळ पुनरावलोकनासाठी वापरा. आठवड्यातून एक दिवस फक्त रिव्हिजन आणि टेस्ट प्रॅक्टिससाठी ठेवा.

दररोज किमान ७ ते ८ तासांची झोप घ्या. पुरेशी झोप न घेतल्यास एकाग्रता आणि स्मरणशक्ती दोन्ही कमी होतात. मेंदूला आराम दिल्याशिवाय नवीन माहिती दीर्घकाळ टिकत नाही.

फॉर्म्युला शीट तयार करा

फिजिक्स, केमिस्ट्री आणि मॅथ्स या विषयांतील सर्व फॉर्म्युले एका वहीत किंवा शीटमध्ये नोंदवा. रंगीत पेनचा वापर करून विषयवार वेगळे करा. ही शीट रोज वाचा आणि प्रवासातही सोबत ठेवा.ऋ त्यामुळे क्विक रिव्हिजन सोपे जाईल.

क्टिव रिकॉल तंत्र वापरा

अभ्यास केलेले विषय पुन्हा पुस्तक न बघता आठवण्याचा प्रयत्न करा. उदाहरणार्थ, फॉर्म्युला झाकून तो आठवा किंवा प्रश्न स्वतः सोडवा. हे तंत्र स्मरणशक्ती मजबूत करते आणि परीक्षेतील प्रश्न सोडवताना आत्मविश्वास वाढवते.

योग्य स्टडी मटेरियल निवडा

JEE तयारीसाठी NCERT पुस्तके हा सर्वात मजबूत पाया आहे. त्यानंतर तज्ज्ञ शिक्षकांनी सुचवलेल्या रेफरन्स बुक्स (जसे की H.C. Verma, R.D. Sharma, O.P. Tandon) वापरा. बेसिक कॉन्सेप्ट मजबूत असतील तर कठीण प्रश्न सुद्धा सोपे वाटतात.

नोट्स व्यवस्थित बनवा

स्वतःचे नोट्स रंगीत पेन, फ्लोचार्ट, आणि हायलाइटरच्या सहाय्याने तयार करा. छोटे पॉइंट्स, उदाहरणे आणि महत्वाचे समीकरणे यात समाविष्ट करा. हे नोट्स शेवटच्या आठवड्यात रिव्हिजनसाठी खूप उपयोगी ठरतात.

एक्झिक्युटिव आणि असिस्टंट माईन सर्व्हेयर पदांसाठी सुवर्णसंधी!

मॉक टेस्ट आणि टेस्ट सीरिज द्या

JEE Main सारख्या परीक्षेसाठी सराव हा यशाचा पाया आहे. आठवड्याला किमान एक मॉक टेस्ट द्या. त्यातून तुमच्या कमतरता ओळखा आणि त्या सुधारा. वेळेचे नियोजन कसे करायचे हेही मॉक टेस्टमधूनच शिकायला मिळते.या सर्व टिप्स नियमितपणे पाळल्यास, तुमची JEE २०२६ ची तयारी अधिक शिस्तबद्ध, आत्मविश्वासपूर्ण आणि परिणामकारक होईल.

लक्षात ठेवा Consistency is the key to success!

# भारत आता रशियाकडून तेल खरेदी करणार नाही

नवी दिल्ली : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नवा दावा केला आहे. हा दावा भारतासंदर्भातील आहे. डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की त्यांचे मित्र नरेंद्र मोदी यांनी त्यांना आश्वासन दिलं आहे की भारत रशियाकडून तेल खरेदी करणं बंद करेल. ट्रम्प यांनी हे यूक्रेन युद्ध समाप्त करण्याच्या दिशेनं मोठं पाऊल असल्याचं म्हटलंय. अमेरिकेच्या अध्यक्षांच्या या वक्तव्यानंतर काँग्रेसनं नरेंद्र मोदींवर टीका केली आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी नरेंद्र मोदी घाबरले असल्याचं म्हटलं. दुसरीकडे ट्रम्प यांच्या या वक्तव्यानंतर भारत सरकारनं स्पष्टपणे म्हटलं की ग्राहकांच्या हिताचं रक्षण करणं ही सर्वोच्च प्राथमिकता आहे.ट्रम्प यांनी बुधवारी ओवलमध्ये पत्रकारांसोबत बोलताना म्हटलं की भारत रशियाकडून तेल खरेदी करतोय यामुळं अमेरिका खूश नव्हती. भारतानं रशियाकडून तेल खरेदी केल्यानं व्लादीमीर पुतिन यांना युद्धासाठी आर्थिक मदत मिळते. ट्रम्प यांनी म्हटलं ते (मोदी) माझे मित्र आहेत, आमच्यामध्ये चांगले संबंध आहेत. आ्ही खूश नव्हतो कारण ते रशियाकडून तेल खरेदी करत होते.रशियाला यूक्रेन युद्ध सुरु करण्यास मदत मिळते, ज्यामुळं १५ लाख लोकांचा मृत्यू झाला.

डोनाल्ड ट्रम्प पुढं म्हणाले की. भारत तेल खरेदी करत होता, त्यामुळं मी खुश नव्हतो आणि (मोदी) यांनी मला आश्वासन दिलं आहे की ते रशियाकडून तेल खरेदी करणार नाहीत.हे एक मोठं पाऊल आहे. आता आम्हाला चीनला देखील असंच करण्यासाठी तयार करावं लागेल. सीआरईएच्या नुसार चीन आणि भारत रशियाकडून सर्वाधिक तेल खरेदी करतात.डोनाल्ड ट्रम्प यांच्या वक्तव्यानंतर विदेश मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सरकारची सर्वोच्च प्राथमिकता ग्राहकांच्या हिताचं रक्षण करणं आहे. रशियाकडून होणाऱ्या तेल खरेदीबाबतच्या प्रश्नावर जयस्वाल यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हटलं की भारत तेल आणि गॅसचा महत्त्वाचा आयातदार देश आहे. अस्थिर ऊर्जा परिस्थितीत भारतीय ग्राहकांच्या हिताचं रक्षण करणं आमची प्राथमिकता आहे.जोपर्यंत अमेरिकेचा प्रश्न आहे, आम्ही काही वर्षांपासून आमच्या ऊर्जा खरेदीचा विस्तार करण्याचा प्रयत्न करत आहोत गेल्या दशकापासून सातत्यानं प्रगती केली आहे.

दरम्यान, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ट्रम्प यांनी महान व्यक्ती म्हटलं. ट्रम्प म्हणाले की ते ट्रम्प यांच्यावर प्रेम करतात, मात्र, मला वाटत की तुम्ही प्रेम या शब्दाचा चुकीचा अर्थ लावावा, त्यांच्या राजकीय करिअरला नुकसान पोहोचवायचं नाही.लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी म्हटलं की नरेंद्र मोदी ट्रम्प यांना घाबरले आहेत. ट्रम्प यांना भारत रशियाकडून तेल खरेदी करणार नाहीत याची परवानगी देतात.अनेकदा दुर्लक्ष करुन देखील शुभेच्छा संदेश पाठवतात. अर्थमंत्र्यांनी अमेरिकेचा दौरा रद्द केला. शर्म अल शेख मध्ये सहभागी झाले नाहीत. ऑपरेशन सिंदूरबाबत त्यांच्या दाव्याचं खंडन देखील करत नाहीत, असं राहुल गांधी म्हणाले.दरम्यान, भारत जगातील तिसरा सर्वात मोठा खनिज तेल आयातदार देश आहे.

# परीक्षा सुरू, हॉलतिकीटच नाही!

## शेकडो विद्यार्थ्यांना फटका; मुंबई विद्यापीठाचे महाविद्यालयांकडे अंगुलीनिर्देश

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/विद्यापीठाशी संलग्न असलेल्या अनेक महाविद्यालयांमध्ये सध्या तिसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या पाचव्या सत्राच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. मात्र सुमारे २५ ते ३० महाविद्यालयांमधील ५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना या परीक्षेची हॉलतिकिटेच न मिळाल्याने त्यांना काही पेपरसाठी बसताच आले नाही. याबाबत विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयाकडे विचारणा केली असता आधी या विद्यार्थ्यांना दंड भरायला लावून नंतर महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे बोट दाखवले. विद्यार्थ्यांनी गुरुवारी विद्यापीठाच्या फोर्ट परिसराच्या प्रवेशद्वारावर आंदोलन केले. मात्र, विद्यापीठाने संबंधित प्रकारात विद्यापीठाची काहीच चूक नसल्याचे सांगत महाविद्यालयाकडे अंगुलीनिर्देश केला. प्रत्यक्षात या विद्यार्थ्यांना पाचव्या सत्राच्या परीक्षेला मुकावे लागले.

महाविद्यालयांमध्ये मंगळवारपासून सुरू असलेल्या पाचव्या सत्राच्या परीक्षेसाठी काही महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना हॉलतिकीट मिळालेच नाही. या विद्यार्थ्यांच्या पालकांनी महाविद्यालयात धाव घेतली असता महाविद्यालयांकडून विविध कारणे देण्यात आली. अर्जुन परब यांचा मुलगा चर्नी रोड येथील भारतीय विद्या भवन महाविद्यालयात तिसऱ्या वर्षाला शिकतो. परीक्षा सुरू झाली तरी त्याला हॉलतिकीटच न मिळाल्याने परब हैराण झाले. याच महाविद्यालयातील आणखी १९ विद्यार्थ्यांसोबतही हाच प्रकार घडला.

पालकांनी महाविद्यालयात धाव घेतल्यानंतर या विद्यार्थ्यांची कागदपत्रे न जमा झाल्याने दंड भरावा लागेल, असे महाविद्यालयांनी सांगितले. त्यानंतर दंड भरूनही आता विद्यापीठाकडून तुमची हॉलतिकिटे न आल्याचे कारण विद्यार्थ्यांना दिले. याबाबत विद्यार्थ्यांनी गुरुवारी विद्यापीठाच्या फोर्ट परिसरात ठिय्या आंदोलन केले. तर पालकांनी विद्यापीठातील अधिकाऱ्यांची भेट घेतली असता त्यांनी हा प्रश्न महाविद्यालय आणि विद्यार्थी यांच्यातील असल्याचे सांगितले.

> विद्यापीठात आम्हाला काहीच सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. आम्हाला त्यांनी कोर्ट परिसरातून विद्यानगरी परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज भवनात पाठवले. मात्र तिथे परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालिकांना भेटूनही काहीच समाधान झाले नाही.
> **- अर्जुन परब, पालक**




**विद्यापीठाचे म्हणणे...**

ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश महाविद्यालांमार्फत निश्चित करण्यात आले होते, अशा सर्व विद्यार्थ्यांना हॉल तिकिटे देण्यात आली आहेत. मात्र ज्यांचे प्रवेश महाविद्यालयांनी निश्चित केले नाहीत, तसेच ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज दाखल केले नाही त्यांना हॉल तिकीट देण्यात आली नाहीत.

विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज दाखल करण्यासाठी विद्यापीठामार्फत परिपत्रक काढून विलंब शुल्क आणि अतिरिक्त विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज दाखल करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या, मात्र वेळोवेळी सूचना देऊनही अद्याप काही विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित आणि परीक्षा अर्ज सादर करण्यात न आल्यामुळे विद्यार्थ्यांना हॉल तिकिटे उपलब्ध झाली नाहीत. यासाठी सर्व संबंधित विद्यार्थी आणि महाविद्यालये जबाबदार असून यामध्ये विद्यापीठाची कोणतीही चूक नाही, असे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले.

**प्रतिसाद नाही...**

याबाबत भवन्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देशभ्रतार यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता बोलणे होऊ शकले नाही. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालिका डॉ. पूजा रौंदाळे यांनीही प्रतिसाद दिला नाही.

**महाराष्ट्र शासन - जलसंपदा विभाग,**
**महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर ४३१००५**
**कार्यकारी अभियंता, गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, छत्रपती संभाजीनगर**
**दुरध्वनी क्रमांक ०२४०-२४५२१०१**
**ई-मेल -** eešghelid1rediffmail.com

**ई-निविदा सुचना क्र. १६ सन २०२५ २०२६**

मा. कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, छत्रपती संभाजीनगर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकाराकडून खालील कामाकरीता ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | |
|---|---|
| **कामाचे नांव** | शिवना टाकळी मध्यम प्रकल्प ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर येथे ११ के. व्ही. विद्युत वाहिनी रोहित्र व विद्युतीकरणाचे काम. |
| **जिल्हा** | जि. छत्रपती संभाजीनगर |
| **निविदेची किंमत रुपये** | रु.८१,७५,३४७/- |
| **ई-निविदा उपलब्ध कालावधी** | दिनांक २४/१०/२०२५ ते दिनांक ३१/१०/२०२५ |
| **ई-निविदा उघडण्याचा दिनांक** | दिनांक ०३/११/२०२५ |

जा.क्र. गोजविवउसिवि/लेशा/११७४/२०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग,
छत्रपती संभाजीनगर
दिनांक : १४/१०/२०२५

**स्वाक्षरीत/-**
**(वि.भा. वाघमारे)**
**कार्यकारी अभियंता,**
**गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग,**
**छत्रपती संभाजीनगर**

**संगा/छत्रपती संभाजीनगर/जाहिरात/ विमाका /१६४/२०२५-२६.**

# मुंबई पोर्ट पान २ वरून....

तर किमान १४ वर्षे (जास्तीत जास्त वयोमर्यादा नाही) वय असणारा उमेदवार या भरतीसाठी अर्ज करण्यास योग्य आहे. नियुक्त झालेल्या उमेदवारांना सरकारी नियमांनुसार, स्टायपेंड पुरवण्यात येईल.

उमेदवारांना प्रशिक्षण कालावधी १२ महिने देण्यात आला आहे.

निवड करण्यात लेखी परीक्षा न घेता थेट मेरिट यादीनुसार निवड करण्यात येणार आहे.

मान्यताप्राप्त विद्यापीठातून B.E/B.Com/B.-/B.Sc/BCA किंवा समतुल्य पदवी आवश्यक. तसेच मान्यताप्राप्त संस्थेतून १० वी पास आणि COPA ट्रेडचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. ज्यांनी याआधी अप्रेंटिस ट्रेनिंग पूर्ण केले आहे, ते उमेदवार पात्र ठरणार नाहीत.

**अर्ज कसा करण्याची पद्धत?**

अधिकृत वेबसाइटवरील अर्जाचा नमुना (Application Form) डाउनलोड करा.

प्रिंट काढून सर्व माहिती हस्ताक्षराने भरा. नाव, जन्मतारीख, पत्ता, संपर्क क्रमांक, ईमेल आयडी, शैक्षणिक तपशील इ.

अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या स्वप्रमाणित प्रती जोडा:

१०वी, १२वी/पदवीचे गुणपत्रक

COPA सर्टिफिकेट (लागू असल्यास)

लीव्हिंग सर्टिफिकेट

पॅन आणि आधार कार्ड

जातीचा दाखला, विवाह प्रमाणपत्र (लागू असल्यास), अपंग सर्टिफिकेट

NEFT द्वारे भरलेल्या शुल्काची पावती

**सर्व कागदपत्रे पुढील पत्त्यावर पाठवा:**

apprentice Training Centre (ATC), तिसरा मजला, भंडार भवन, एन.व्ही. नखवा मार्ग, मझगाव (पूर्व), मुंबई - ४०००१०

# भारतीय सशस्त्र सैन्यदलात अधिकारी पदाच्या तयारीसाठी एस.एस.बी. कोर्ससाठी मोफत प्रशिक्षण

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी**/ भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्याची इच्छा असलेल्या महाराष्ट्रातील युवक-युवतींसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ ते १२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत एस.एस.बी. (SSB) कोर्स क्र. ६३ आयोजित करण्यात आला आहे. या कोर्समध्ये प्रशिक्षणार्थींना निःशुल्क प्रशिक्षण, निवास आणि भोजनाची सोय करण्यात आली आहे.

**सुवर्णसंधी**

मुंबई शहर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी दिनांक २० ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, मुंबई शहर येथे मुलाखतीस हजर रहावे. उमेदवारांनी सैनिक कल्याण विभाग च्या वेबसाईटवरून SSB-63 कोर्ससाठी प्रवेशपत्र व त्यासोबतची परिशिष्टे डाउनलोड करून ती पूर्ण भरून, मुलाखतीच्या दिवशी सोबत आणणे आवश्यक आहे.

**पात्रता-**या प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी उमेदवारांकडे पुढीलपैकी कोणतीही एक पात्रता असणे आवश्यक आहे:कंबाईंड डिफेन्स सर्विसेस एक्झामिनेशन(CDSE-UPSC) किंवा नॅशनल डिफेन्स अकेडमी एक्झामिनेशन (NDA-UPSC) परीक्षा पास, तसेच सर्विसेस सिलेक्शन बोर्ड (SSB) मुलाखतीसाठी पात्रता प्राप्त केलेली असावी.

एनसीसी "C' प्रमाणपत्र '-' किंवा "B' ग्रेडसह उत्तीर्ण, आणि एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरकडून यस एस एस बी SSB साठी शिफारस मिळालेली असावी.टेक्निकल ग्रॅज्युएट कोर्स साठी (Technical Graduate Course) साठी SSB कॉल लेटर असणे आवश्यक.



विद्यापीठ प्रवेश प्रणाली (University Entry Scheme) साठी SSB कॉल लेटर किंवा शिफारस यादीत नाव असलेले असावे.अधिक माहितीसाठी इच्छुकांनी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे ईमेल (training.petenashikgmail.com), दूरध्वनी क्रमांक ०२५३-२४५१०३२ किंवा व्हॉट्सअॅप नंबर ९१५६०७३३०६ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, मुंबई शहर यांनी केले आहे.

नौकरी एक्सप्रेस
संकेत स्थळ- naukriexpress.in

संपूर्ण महाराष्ट्रात जलद गतीने विस्तारित होत असलेल्या
'नौकरी एक्सप्रेस' या अग्रेसर
मानांकित वृत्तपत्राच्या महाराष्ट्रातील जिल्हयासाठी

औरंगाबाद, नागपूर, पुणे, अमरावती, लातूर, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, मुंबई, जळगांव, रत्नागीरी, ठाणे, पालघर, नंदुरबार, नांदेड, चंद्रपूर, गडचिरोली, अहमदनगर, सातारा या विभागातून एकाच वेळी प्रकाशीत होणारे वृत्तपत्र या ठिकाणी/तालुका प्रतिनिधी / वार्ताहर पाहिजेत.

-: पात्रता :-
कोणत्याही शाखेतील पदवी, पदविका, पत्रकारिता पदवी,पदविका किवां १२ वी.पास असवा.

इच्छुकानी त्वरित संपर्क साधावा



सुग्रीव मुंडे
मुख्य संपादक
मो.९४२१२८१०७८
-.९३७०१९९८१३

ई-मेल-naukriexpress.impact@gmail.com

सुचना: परिसरातील घडामोडी, राजकीय, शैक्षणिक, भौगोलिक परिस्थिती चे परिपूर्ण ज्ञान असणे आवश्यक.

**महिलांसाठी मोठी बातमी!**

# देशातील सर्वात मोठ्या बँकेत मिळणार नोकरीची संधी?

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी**/ भारतातील सर्वात मोठी सार्वजनिक क्षेत्रातील बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया ने पुढील पाच वर्षांत महिला कर्मचाऱ्यांची संख्या ३० टक्क्यांपर्यंत वाढवण्याची योजना विकसित केली आहे. डइख मध्ये २.४ लाखांहून अधिक कर्मचारी आहेत, जे देशातील कोणत्याही संस्थेत सर्वाधिक आणि बँकिंग क्षेत्रातील सर्वोच्च आहे.

> **३० टक्क्यांपर्यंत महिला कर्मचारी वाढवणार**

SBI चे उपव्यवस्थापकीय संचालक (HR) आणि मुख्य विकास अधिकारी (CDO) किशोर कुमार पोलुदासू यांनी एका मुलाखतीत सांगितले की, जर आपण आघाडीच्या कर्मचाऱ्यांचा विचार केला तर सुमारे ३३ टक्के महिला आहेत, परंतु एकूणच ही संख्या २७ टक्के आहे. म्हणून, आम्ही ही संख्या सुधारण्यासाठी काम करु. बँक ही तफावत कमी करण्यासाठी आणि महिला कर्मचाऱ्यांची संख्या ३० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य साध्य करण्यासाठी पावले उचलत असल्याचे त्यांनी सांगितले.

महिलांसाठी चांगले कामाचे ठिकाण

किशोर कुमार पोलुदासू यांनी पुढे सांगितले की, बँकेचे उद्दिष्ट असे कार्यस्थळ निर्माण करणे आहे जिथे महिला सर्व स्तरांवर भरभराटी करू शकतील. यासाठी, एसबीआय नेतृत्व आणि काम-जीवन



संतुलनाला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष कार्यक्रम राबवत आहे. महिलांसाठी बँकेने घेतलेल्या काही उपक्रमांची माहिती देताना, पोलुदासू म्हणाले की, बँक नोकरी करणाऱ्या मातांना पाळणाघर भत्ता देते, फॅमिली कनेक्ट कार्यक्रम चालवते आणि प्रसूती, वाढीव रजा किंवा आजारी रजेवरून परतणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना मदत करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम देते.

महिलांसाठी एम्पॉवर हर हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. नेतृत्व भूमिकांसाठी महिलांना ओळखणे, मार्गदर्शन करणे आणि तयार करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. यामध्ये भविष्यासाठी शीर्ष महिला अधिकाऱ्यांची एक मजबूत टीम विकसित करण्यासाठी नेतृत्व प्रयोगशाळा आणि प्रशिक्षण सत्रांचा समावेश आहे. एसबीआयच्या देशभरात ३४० हून अधिक शाखा आहेत ज्या केवळ महिलांनी भरलेल्या आहेत आणि भविष्यात ही संख्या वाढेल.

**सर्व क्षेत्रांमध्ये आणि सर्व नोकरीच्या पातळीवर महिला कर्मचारी उपस्थित**

सर्व क्षेत्रांमध्ये आणि सर्व नोकरीच्या पातळीवर महिला कर्मचारी उपस्थित आहेत, जे बँकेच्या समावेशकतेबद्दलच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. बँकेकडे आयटी-तज्ञ अधिकाऱ्यांचा एक गट आहे जो बँकिंग कामकाजात सुरक्षा, कार्यक्षमता आणि नावीन्य यावर लक्ष केंद्रित करतो. मालमत्तेच्या बाबतीत एसबीआय जगातील शीर्ष ५०बँकांमध्ये आहे आणि अनेक संस्थांनी तिला सर्वोत्तम नियोक्ता म्हणून मान्यता दिली आहे.

# mpsc/upsc राज्यसेवा परिक्षा सराव प्रश्न..

**प्र.१–पुढीलपैकी योग्य पर्याय निवडा?**
(अ)मुंग्याच्या डंखामध्ये फॉर्मिक आम्ल असते.
(ब)मधमाशीच्या डंखामध्ये ही फॉर्मिक आम्ल असते.
(क)मधमाशी आपल्या डंखामध्ये मेलिटीनचा वापर करते.
वरीलपैकी बरोबर काय?
(१)फक्त अ (२)फक्त ब (३)अ,ब (४)अ,ब,क

**प्र.२–खालीलपैकी अयोग्य विधान ओळखा?**
(१)हायड्रोजन व ऑक्सीजन याचे वजनी प्रमाण १:८ आहे
(२)दुधाचे दही होणे हा भौतिक बदल आहे.
(३)अन्नपदार्थाचे पचन हा रायायनिक बदल आहे.
(४)संयुगाचे घटक रासायनिक पध्दतीने वेगळे करता येतात.

**प्र.३–खालीलपैकी अयोग्य विधान ओळखा?**
(१)सिलिकॉन हा धातूसदृश आहे.
(२)धातू विजेचे व उष्णतेचे सुवाहक असतात.
(३)अधातू तंतूक्षम व वर्धनीय असतात.
(४)ग्रॅफाइट हा विजेचा सुवाहक आहे.

**प्र.४–खाली दिलेल्या पदार्थांपैकी 'अल्केन'ओळखो?**
(१)$C_2H_4$ (२)$C_2H_2$ (३)$C_6H_{14}$ (४)CH

**प्र.५–खालीलपैकी चुकीची जोडी ओळखा?**
(१)फ्रेऑन–रेफ्रीजरेटर (२)बीटा कॅरोटीन–गाजर
(३)आयसाप्रीन–नैसर्गिक रबर (४)मिथेन–पॉलिथीन

**प्र.६–खालीलपैकी अयोग्य विधान ओळखा?**
(१)बॉम्ब मधील स्फोटक मिश्रण ही स्थितील ऊर्जा आहे.
(२)घड्याळाला चावी दिली की घड्याळाला ऊर्जा प्राप्त होते.
(३)धरणामध्ये साठवलेल्या पाण्यापासून वीज निर्मिती करतांना स्थितीज ऊर्जेचे विघुत रुपांतर होते.
(४)वरीलपैकी नाही

**प्र.७–कुरकुरे चिप्स हवाबंद वेष्टनात साठवून ठेवतात ते तसेच राहावेत यासाठी खालीलपैकी कोणता वायू वापरतात?**
(१)ऑक्सीजन (२)नायट्रोजन
(३)हायड्रोजन (४)कार्बन डायऑक्साईड

**प्र.८–खालीलपैकी अयोग्य विधान ओळखा?**
(१)चंद्रावरील गुरूत्वबल पृथ्वीच्या १/६ पट असते.
(२)गुरूत्वकरण सुमद्रसपाटीवर जास्त तर शिखरावर कमी असते.
(३)विषुवृत्तावर गुरूत्व त्वरणाचे मूल्य सर्वात जास्त असते.
(४)पृथ्वीच्या केंद्रभागी गुरुत्व त्वरण शून्य असते.

**प्र.९–खालीलपैकी....हे संयुग भारताच्या अणुऊर्जा कार्यक्रमातील पहिल्या टप्प्यात मंदक व शीतक म्हणून वापरतात?**
(१)$H_2O$ (२)$H_2O_2$ (३)$D_2O$ (४)$H_9$

**प्र.१०–खालीलपैकी योग्य जोडी ओळखा?**
(१)थॅलोफायटा–शैवाल (२)ब्रायोफायटा–सायकस
(३)टेरिडोफयटा–नेचे (४)अनावृत्तबीजी–देवदार

**प्र.११–खालीलपैकी योग्य विधान ओळखा?**
(१)पेशीच्या भागापैकी आंतरद्रव्यजालिका विविध घटनांचे वहन करते.
(२)केंद्रकांमध्ये जनुकीय माहिती असते.
(३)तंतुकणिकामध्ये अंतःश्वसन घडते.
(१)फक्त अ (२)फक्त ब (३)अ,ब (४)अ,ब,क

**प्र.१२–'स्वादुपिंड' या अवयवाच्या अंतःस्त्रावी भागाकडून..... स्त्रवले जाते?**
(१)ट्रिप्सीन (२)अमायलेझ (३)लायपेज (४)इन्सुलिन

**प्र.१३–झुरळ हे खालीलपैकी.....वर्गात येते?**
(१)मोलुस्का (२)इकायनोडर्माटा
(३)आथ्रोपोडा (४)हेमिकॉर्डाटा

**प्र.१४–पुढे मुलद्रव्यांच्या वर्गीकरण बाबत दिलेले पर्याय पडताळून त्यातील विसंगत निवडा?**
(१)बोरॉन–धातू (२)ब्रोमीन–अधातू
(३)पारा–धातू (४)सिलीकॉन–धातू सदृश

**प्र.१५–खालीलपैकी चुकीची जोडी ओळखा?**
(१)मेंदूज्वर–क्यूलेक्स डास (२)डेंग्यु–एडिस एजिप्ती
(३)मलेरिया–ॲनाफिलस (४)वरीलपैकी सर्व बरोबर

**प्र.१६–पुढील कोणत्या परिस्थितीमध्ये भारतातील एकाद्या राज्याचे मुख्यमंत्री हे राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीमध्ये मत देण्यासाठी अपात्र असतील?**
(१)जेव्हा ते स्वतः राष्ट्रपती पदाचे उमेदवार असतील
(२)अजुन त्यांनी राज्याच्या कनिष्ठ सभागृहापुढील बहुमतासाठीचे विश्वास मत जिंकले नाही
(३)ते राज्याच्या वरिष्ठ सभागृहाचे सदस्य असतील
(४)ते काळजीवाहू मुख्यममंत्री असतील

**प्र.१७–खालीलपैकी कोण एखाद्या राज्याचे मुख्यमंत्री न राहता एकदम पंतप्रधान पदी विरनाजमान झाले?**
(१)मोरारजी देसाई (२)चरणसिंग
(३)वि.पी.सिंग (४)चंद्रशेखर
(५)पी.व्ही.नरसिंम्हाराव

**प्र.१८–खालीलपैकी कोणत्या बाबी ह्या उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय याा दोघांच्या अधिकारक्षेत्रात येतात?**
(१)राज्य आणि केंद्र सरकारमधील वाद (२)राज्य सरकारांमधील वाद.
(३)मूलभूत हक्काचे संरक्षण. (४)राज्यघटनेचे संरक्षण करणे.

**प्र.१९–दिनेश गास्वामी समिती ही कशाशी संबंधित होती?**
(१)बँकाचे अ –राष्ट्रीयीकरण (२)निवडणुका सुधारणा
(३)ग्राहक संरक्षण (४)निर्वासितांचे पुनर्वसन

**प्र.२०–जर पंचायत भंग केली तर निवडणुका किती कालावधीत घेतले जातात?**
(१)१ महिन्यात (२)३ महिन्यात
(३)६ महिन्यात (४)१वर्षांत

**प्र.२१–RBI ने २०१३–१४ मध्ये खाजगी क्षेत्रामध्ये बँक उभारण्यास परवानगी दिली आहे त्या संदर्भात पुढील विधाने पहा?**
(अ)देशात२७सार्वजक क्षेत्रातील तर २२खाजगी क्षेत्रातील बँक कार्यरत आहे.
(ब)बँक परवाण्यासाठी आलेल्या २७ अर्जापैकी फक्त २ अर्जांनाच बँक स्थापन करण्यासाठी परवाणगी दिली आहे.
(क)या आगोदर२०१३मध्ये कोटक महिद्रा आणि येस बँकेला परवानगी दिली आहे.
वरीलपैकी बरोबर काय?
(१)फक्त ब क (२)फक्त ब (३)अ,ब,क (४)एकही नाही

**प्र.२२–IPCC** (इंटरगव्हर्नटमेंट नॅनेल ऑन क्लायमेट चेंज) याचा **कितवा अहवाल ३० मार्च २०१४रोजी प्रकाशीत झाला?**
(१)चौथा (२)पाचवा (३)सहावा (४)सातवा

**प्र.२३–भारताने IRNSS 1-B या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण केले आहे त्यासंदर्भात पुढी माहिती पहा?**
(अ)या प्रक्षेपकाच्या सहाय्याने हा आवकाशात सोडण्यात आला.
(ब)हा भारतीय प्रदेशिक दिशा दर्शक उपग्रह प्रणालीचा भाग आहे.
(क)या अंतर्गत एकूण ८ उपग्रह सोडण्यात येणार आहेत.
वरीलपैकी अचूक विधान निवडा?
(१)फक्त अ (२)फक्त ब (३)फक्त क (४)एकही नाही

**प्र.२४–सूर्यमालेतील शनिग्रह संदर्भात पुढील माहिती वाचून अचूक पर्याय निवडा?**
(१)सूर्यापासून ६वा ग्रह आहे व त्याला ५३चंद्र(उपग्रह)असून ९ हंगामी चंद्र आहेत.
(२)'कॅसिनी'अवकाशयान हे २००४मध्ये नासा व युरोपिय स्पेस एजन्सी यांनी शनिग्रहाच्या अभ्यासाठी पाठविले.
(३)नुकतेच शनी ग्रहाच्या'एनक्लेडस' उपग्रहावर वितळलेल्या पाण्याच्या महासागराचा शोध लागला.
(१)अ ब (२)ब क (३)अ क (४)अ ब क

**प्र.२५–कोणत्या पिकांत सर्वसाधारण १५ टक्के साखर असते?**
(१)ऊस (२)स्वीट कॉर्न (३)शुगर बीट (४)स्वीट सोरगम

**प्र.२६–जागतिक आराग्य दिन २०१४चे घोषवाक्य (थीम) पुढीलपैकी कोणते आहे?**
(१)Small Bite: Big threat (२)Protect health : protect Environment
(३)ISave the life
(४)IInvesr in the future, Defeat malaria

**प्र.२७–महाराष्ट्रच्या आर्थिक पहाणी अहवालानुसार २०१४–१५ आथिक वर्ष २०१५–१६ मध्ये स्थूल उत्पन्न किती वर्तवण्यात आले आहे?**
(१)७.३% (२)८.५% (३)५.७% (४)६.७%

**प्र.२८–भारताचे संयुक्त राष्ट्रातील (युनो) कायमचे प्रतिनिधी कोण आहेत?**
(१)निरूपम सेन (२)संजय निरूपम(३)निरूपमा राव(४)कमलेश शर्मा

**प्र.२९– 'सुबाभळ' ही .....या देशातील मूळ वनस्पती होय.**
(१)दक्षिण मेक्सिको (२)उत्तर भारत (३)दक्षिण कोरिया (४)दक्षिण भारत

**प्र.३०–व्हिएन्ना कन्व्हेन्शन संदर्भात पुढील माहिती पाहा.**
(अ)हे राजनैतिक संरक्षणासंदर्भात आहे.
(ब)१८एप्रिल१९६१ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाची या विषयावर बैठक झाली.
(क)२४एप्रिल१९६४पासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली.
(ड)राजनैतिक अधिकाऱ्यांनी त्याच्या कार्यालयीन कामकाजाव्यतिरिक्त केलेल्या कामांना देखील राजनैतिक संरक्षण लागम असते.
अचूक विधान निवडा?
(१)फक्त अ (२)फक्त ब (३)फक्त क (४)एकही नाही

**प्र.३१–सौर ऊर्जेसंबधांत खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?**
(१)सौर ऊर्जा म्हणजे ऊर्जेचा अक्षय स्त्रोत होय.
(२)सौर ऊर्जा हा ऊर्जेचा स्वच्छ स्त्रोत होय.
(३)सौर ऊर्जा आपणांस सहजगत्या उपलब्ध होते.
(४)सौर ऊर्जा म्हणजे ऊर्जेचा संहत स्त्रोत होय.

**प्र.३२–आशिया खंडातील सर्वात मोठी लोकर बाजारपेठ कोणती?**
(१)बीकानेर (२)काश्मीर (३)जोधपूर (४)बद्रीनाथ

**प्र.३३–पुढे भुरूपे व कारके यांच्या जोड्या दिल्या आहेत. यापैकी अचूक नसणारी जाडी निवडा.**
(१)लोबंती दरी, शुककूट–हिमनदी (२)नालाकृती सरोवर–नदी
(३)यारदांग,वातकमान–वारा (४)आघातछिद्र–हिमनदी

**प्र.३४–...... शा आदिजीवामुळे मनुष्यास मलेरिशया हा रोग होतो.**
(१)युग्लिना (२)पॅरॅमेशियम (३)प्लाझममोडियम (४)एन्टामिबा

**प्र.३५–पुढे गंगा नदी प्रणाली बाबत दिलेली विधाने अभ्यासा व त्यातील योग्य ओळखा.**
(अ)गंगा नदीचे खोरे भारताच्या क्षेत्रफळाच्या २६.३ टक्के इतके आहे.
(ब)गंगा नदी ऋषिकेश येथे मैदानी प्रदेशात प्रवेश करते.
(क)चंबळ,केन या नघा गंगा यमुना संगमानंतर गंगा नदीस येऊन मिळतात.
(१)फक्त अ (२)अ, ब (३)ब, क (४)ब अ क

**प्र.३६–भारताच्या एकूण जंगलाखालील क्षेत्रापैकी किती ९६ जंगलाचे हिमालयात आहे?**
(१)२०% (२)५२% (३)३०% (४)८०%

**प्र.३७–अतिमद्यपणामुळे नयसिन (जीवनसत्व बी–५)चा अभाव निर्माण होऊन ......... हा रोग जडतो.**
(१)बेरीबेरी (२)पेलाग्रा (३)मुडदूस (४)रिकेट्स

**प्र.३८–मान्सूनच्या आधी भारतात येणारी वादळे किंवा पाऊस यांना भारतात विविध नावांनी ओळखले जाते.पुढील पर्यायातील चुकीची जोडी ओळखा?**
(१)पश्चिम बंगाल–कालबैसाखी (२)महाराष्ट्र–वळवाचा पाऊस
(३)उत्तरप्रदेश,पंजाब–नॉर्वेस्टर (४)केरळ,कर्नाटक–कॉफी बहार

**प्र.३९–कोणते बंदर स्वातंत्र्यानंतर सर्वात पहिले विकसित झाले?**
(१)कांडला (२)चेन्नई (३)मुंबई (४)कोलकत्ता

**प्र.४०–कोणत्या दोन नदिचे उगमस्थान जवळजवळ आहे ?**
(१)सिंधू–गंगा (२)ब्रम्हपुत्रा–सिंधू
(३)तापी–नर्मदा (४)बियास–सिंधू

**प्र.४१–अतिलठ्ठपणा सुचित करणारा देह वस्तुमान निर्देशांक म्हणजे........?**
(१)वजन/उंची (२)वजन (किग्रॅ/उंची$^2$) (मीटर)
(३)वजन (ग्रॅ/उंची$^2$) (मीटर) (४)वजन (पौंड/उंची) (मीटर)

**प्र.४२–संधीपाद(आर्थ्रोपोडा) प्राण्यांच्या खालोखाल प्राणीदृष्टीतील दुसऱ्या क्रमकांचा मोठा संघ कोणता?**
(१)पोरिफेरा (२)इकायनोडर्माटा
(३)मोलुस्का (४)स्पंज(सिलेंटाराटा)

**प्र.४३–चुकीची जोडी निवडा.**
(१)पश्चिम द्रुतगती मार्ग–अलियावर जंग मार्ग
(२)पुर्व द्रुतगती मार्ग–शंकरराव चव्हाण मार्ग
(३)ब्रांदा सि–लिंक–राजीव गांधी लिंक
(४)यापैकी नाही

**प्र.४४–सर्वात कमी तालुके कोणत्या जिल्ह्यात आहे?**
(१)धुळे (२)नंदुरबार (३)हिंगोली (४)वाशिम

**प्र.४५–महाराष्ट्रात सर्वात कमी लागवडीखालील क्षेत्र कोणत्या जिल्ह्यात आहे?**
(१)रायगड (२)भंडारा (३)गडचिरोली (४)यवतमाळ

**प्र.४६–खालील दिलेल्या कोणत्या जिल्ह्यात ऋणात्मक लोकसंख्या वृध्दीदर आहे?**
(१)मुंबई,रत्नागिरी,सिंधुदुर्ग (२)मुंबई,गडचिरोली,मुंबई उपनगर
(३)मुंबई,रायगड (४)मुंबई,रत्नागिरी,गडचिरोली

**प्र.४७–२+४+६–८–१०–१२+१४+१६+१८–२०–...–७०**
(१)–१०६ (२)–१६४ (३)–१८२ (४)+३१२

**प्र.४८–२,३,४,५ या अंकापैकी प्रत्येक अंक एकदाच वापरून मी जास्तीत जास्त किती तीन अंकी संख्या तयार करू शकतो?**
(१)१८ (२)२४ (३)३२ (४)६४

**प्र.४९–एका रकमंची सहापट सरळव्याजाने १५वर्षात होते तर १८ पट होण्यासाठी किती वर्षे लागतील?**
(१)४५ (२)४८ (३)५१ (४)५४

**प्र.५०–३१७+६१६+५२५ च्या एककस्थानाची किंमत किती?**
(१)३ (२)६ (३)५ (४)८

**प्र.५१–२A=३B =४ Cआणि A+B+C=१९५० तर A ही किती रुपये आहे?**
(१)६०० (२)९०० (३)४५० (४)१२०

**प्र.५२–एक वर्तुळ व आयात यांची परिमिती समान आहे. तर आयताची लांबी १८संमी व रुंदी २६सेमी असेल तर वर्तुभाचे क्षेत्रफळ किती?**
(१)८८सेमी$^2$ (२)१५४सेमी$^2$ (३)१२५०सेमी$^2$ (४)६१६सेमी$^2$

**प्र.५३–१५०००रु ची वस्तु १०% नफ्याने विकण्याऐवजी १२% तोट्याने विकली तर दोन विक्री किंमतीतील फरक किती?**
(१)३३०० (२)२१०० (३)३००० (४)४०००

**प्र.५४–८ सेमी बाजू असणाऱ्या घनापासून दोन सेमी बाजू असलेले किती घन असतील?**
(१)२७ (२)६४ (३)१६ (४)१२५

**प्र.५५–अशा घनाला रंग देऊन नंतर तो कापला तर असे किती घन असतील ज्यांची एकही बाजू रंगविलेली नाही?**
(१)८ (२)२७ (३)४ (४)१२५

**प्र.५६–असे किती घन असतील ज्यांच्या तीनही बाजू रंगवलेल्या आहे?**
(१)८ (२)२७ (३)६४ (४)१२५

**प्र.५७–लीड बँक पध्दती खालील वर्षी सुरू झाली?**
(१)१९६७ (२)१९६० (३)१९६९ (४)१९७०

**प्र.५८–रुपयाचे अवमुल्यन म्हणजे.......**
(१)रूपयाचे मुल्य वाढणे (२)रूपया नव्याने चलनात आणणे
(३)रूपयाची किंमत कमी करणे (४)वरील सर्व

**प्र.५९–ऊसाच्या उत्पादनात खालील देशाचा दुसरा क्रमांक लागतो?**
(१)ऑस्ट्रेलिया (२)ब्राझील (३)भारत (४)दक्षिण आफ्रिका

**प्र.६०–भारतातील प्रादेशिक विषमता अधिक असून मी गेल्या काही वर्षात वाढत आहे कारण.....**
(१)काही निवडक ठिकाणीच सातत्याने गुंतवणूक होत आहे.
(२)काही क्षेत्रातील कृषी हवामान विकासाला पोषक नाही
(३)काही क्षेत्रात कृषी स्थित्यंतर अत्यल्प आहे, परिणामी तेथे आर्थिक संधी नाहीत.
(४)काही क्षेत्रात राजकीय अस्थिरता आहे

**प्र.६१–सहकारी वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांचे तीन स्तरीय रचनेत खालील संस्थांचा अंतर्भाव होतो?**
(१)प्राथमिक सहकारी संस्था (२)जिल्हा मध्यवर्ती संस्था
(३)राज्य सहकारी बँक (४)वरील सर्व

**प्र.६२–फेमा(फॉरेन एक्सचेंज मॅनेजमेंट ॲक्ट) कायदा.....यासाली अंमलात आला?**
(१)२००३ (२)२००५ (३)१९९९ (४)२००२

**प्र.६३–फोकस मार्केट योजना ही.या उद्योगअंमर्गत राबविली जाते.**
(१)कृषिबाजार (२)आयात–निर्यात
(३)राज्यातील उद्योग (४)कोणतेही नाही

**प्र.६४–भांडवली बाजारात खालील मुदतीसाठी निधी संकलीत केला जातो?**
(१)मध्यम (२)दिर्घ (३)अल्प (४)कोणतेही नाही

**प्र.६५–भारताच्या लोकसंख्यापैकी किती टक्के लोकसंख्या BPL खाली आहे?**
(१)३०% (२)२०% (३)२५% (४)२६%

**प्र.६६–तुटीच्या अंदाजपत्रकात सरकार खालील स्त्रोतातून निधी कर्जाऊ घेते?**
(१)राज्याचे भउत्पादन (२)जागतिक बँकेककडून
(३)रिझर्व बँकेककडून (४)क्कोणतेही नाही

**प्र.६७–अयोग्य विधान ओळखा.**
(१)१९४९ ममध्ये रूपयाचे सर्वप्रथम अवमूल्यन झाले.
(२)५जून १९६६ रोजी दुसऱ्यांना रूपयाचे अवमूल्यन झाले.
(३)१९६६ मध्ये ३६% इतके रूपयाचे अवमूल्यन झाले.
(४)१९८९ मध्ये मिसऱ्यांदा रूपयाचे अवमूल्यन झाले.

**प्र.६८–कंपनीचे कर्जरोखे धारक हे कंपनीचे कोण असतात?**
(१)मालक (२)धनको (३)ऋणको (४)ठेवीदार

**प्र.६९–मालमत्तेवरील घसरा म्हणजे...... ?**
(१)मालमत्ता नष्ट होणे (२)व्यवसाय अवसायनात येणे
(३)मालमत्ता चोरीस जाणे (४)मालमत्तेची वापरामुळे किंमत घटणे

**प्र.७०–केंद्र सरकारचा विकासावरील खर्च (dev.exp) यासंज्ञेत ..... याचा अंतर्भाव होत नाही.**
(१)संशोधन खर्च (२)संरक्षणावरील खर्च
(३)राज्यांना अनुदान (४)सामाजिकक विकासावरील खर्च

**प्र.७१–तीव्र,अधिक समावेशक धारणीय विकाय हे सूत्र....या नियोजन काळाने निश्चित केलेल आहे.**
(१)१०वी योजना (२)११वी योजना
(३)१२वी योजना (४)२व३वी योजना

**प्र.७२–पुढील विधाने वाचा.व पर्याय निवडा.**
(अ)ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस या संघटनेचे अध्यक्ष लाला लजपतराय हे होते.
(ब) ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसचे सेक्रेटरी दिवाण चमनलाल हे होते.
(१)फक्त अ बरोबर (२)फक्त ब बरोबर
(३)अ,ब दोन्ही बरोबर (४)अ,ब,दोन्ही चूक

**प्र.७३–लाल बावटा किसान सभेची स्थापना कोणी केली?**
(१)गोदावरी पेरूळेकर (२)शरद जोशी
(३)कॉ.उषा मेहता (४)अण्णाभाऊ साठे

**प्र.७४–पुढीलपैकी चुकीचा मुद्दा निवडा.**
(अ)मुळशी धारणाबाबत शेतकऱ्यांमध्ये जागृती करण्यासाठी तात्यासाहेब केळकरांच्या अध्यक्षतेखाली डिसेंबर १९२० रोजी विराट सेभेचे आयोजन करण्यात आले होते.
(ब)इंग्लीश कंपनी विंडसर ने धरणावर जलविद्युत प्रकल्प सुरू करण्यासाठी शेतकऱ्यांवर अन्याय केला जातो.
(१)फक्त अ (२)फक्त ब (३)फक्त क (४)एकही नाही

**प्र.७५–कृ.प्र.खाडिलकर यांनी त्यांच्या पुढीलपैकी कोणत्या नाटकातून लॉर्ड कर्झनच्या राज्यकारभाराबद्दल सामान्य माणसाच्या मनात निर्माण झालेला असंतोद्य व्यक्त केला?**
(१)गवतास जेथे भाले फुटतात (२)लंकादहन
(३)भस्ममासुर (४)कीचकवध

**प्र.७६–१८३१ मध्ये ...... संधोकाने सजीवांच्या पेशीतील केंद्रकाचे अस्तित्व सर्वप्रथम सिध्द केले.**
(१)रॉबर्ट हूक (२)लिबेन हूक
(३)रॉबर्ट ब्राऊन (४) जोहास्न पुरर्किजे

**प्र.७७–मलेरियाग्रस्त व्यक्तिकडून दुसऱ्या निरोगी व्यक्तीकडे मलेरियाचा प्रसार करण्यात .......ची महत्वाची भूमकि असते.**
(१)अमिबा (२)एन्टामिबा
(३)थयूलेक्स डासाची मादी (४)ॲनाफिलेस डासाचीी मादी

**प्र.७८–ब्रिटिश काळात मुंबई इलाख्याचे पहिले शिक्षणमंत्री म्हणून कोणाची नियुक्ती करण्यात आली?**
(१)नाना शंकरशेठ (२)बाळशास्त्री जांभेकर
(३)रँग्लर परांजपे (४)न्या.तेलंग

**प्र.७९–जॉन रस्कीन यांच्या'अन टू धीस लास्ट' या पुस्तकाच्या वाचनानंतर पुढीप्रमाणे कोणामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडून आले?**
(१)महात्मा गांधी (२)योगी अरविंद घोष
(३)लोकमान्य टिळक (४)भगतसिंग

**प्र.८०–....... हे संप्रेरक शरीरातील ग्लुकोज, मेद व अमिमनो आम्ले यांचे चयापचय नियंत्रित करते.**
(१)हिमोग्लोबीन (२)इन्सुलिन (३)ग्लोब्यूलिन (४)अल्ब्यूमिन

**प्र.८१–पुढीलपैकी अयोग्य पर्याय निववडा.**
(१)१७९३चा चार्टर ॲक्ट–गव्हर्नर जनरलने मुंबई व मद्रास प्रांतातील अधिकार वाढले.
(२)१८१३चा चार्टर ॲक्ट–इंडिया कंपनीची भारतातील व्यापारी मक्तेदारी संपुष्टात
(३)१८३३चा चार्टर ॲक्ट–कंपनीने भारतीयांच्या शिक्षणासाठी दरववर्षी१ लाख रु.खर्च करावे.
(४)१८५३चा चार्टर ॲक्ट–भारतीय शासनव्यस्थेतील कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ याच्या फारकतीस सुरूवात झाली.

**प्र.८२–इंग्रजी काळात वृत्तपत्राचा उदय व प्रसार झाला. पुढीलपैकी कोणत्या वृत्तपत्राचे रुपांतर'टाइम्स ऑफ इंडिया' या वृत्तपत्रात झाले?**
(अ)बॉम्बे टाईम्स (ब)स्टँडर्ड (क)टेलिग्राफ
(१)अ ब (२)अ क (३) फक्त अ (४)अ ब क

**प्र.८३–दोन इलेक्ट्रॉन्सच्या भागीदारीतून ......... सहसंयुज बंध तयार होतो.**
(१)एकेरी (२)दुहेरी (३)तिहेरी (४)यापैकी नाही

**प्र.८४–९७ववी घटनादुरूस्तीनुसार राज्यघटनेतील कोणत्या कलमामध्ये दुरूस्ती/समाविष्टता करण्यात आली आहे?**
(अ)कलम १९ (ब)४३वी (क)२४३
(१)अ (२)अ ब (३)अ क (४)अ ब क

**प्र.८५–बॉक्साइठ या धातूकापासून विद्युत अपघनी क्षपण पध्दतीने ............ या धातूचे निर्ष्कषध केले जाते.**
(१)ॲल्युमिनियम (२) तांबे (३) जस्त (४)जर्मेनियम

**प्र.८६– समस्थानिके दर्शविणाऱ्या मूलद्रव्यांचा अणुअंक .......... असतो.**
(१)समान (२)भिन्न (३)लहान (४)मोठा

**प्र.८७–लोकसभेचे प्रतिनिधी(mp)हे प्रत्यक्ष प्रौढ,गुप्त,मतदानाव्दारे निववडले जातील असा उल्लेख राज्यघटनेच्या कोणत्या कलमामध्ये आहे?**
(१)कलम ८० (२)कलम८२ (३)कलम८३ (४)कलम८४

**प्र.८८–जिल्हा परिषदेखा पद्सिध्द सचिव कोण?**
(१)मुख्य कार्यकारी अधिकारी (२)उपमुख्य कार्यकारी अधिकारी
(३)अतिरिक्त कार्यकारी अधिकारी (४)जि.प.अध्यक्ष

**प्र.८९–पुढीलपैकी जिल्हाधिकाऱ्यांचे कार्य कोणते नाही?**
(१)ते जिल्हा दंडाधिकारी असतात.
(२)ते जिल्हा निवडणूक अधिकारी असतात.
(३)ते जिल्हर नियोजन मंडळाचे अध्यक्ष असतात.
(४)ते जिल्हा जनगणना अधिकारी असतात.

**प्र.९०–निगरपालिका मुख्यधिकारी हे पद रिक्त असेल तर शासन त्या नगरपालिकेचा प्रभारी कार्यभार कोणाकडे सोपवेल?**
(१)तीसिलदार (२)ग्रामीण पोलिस अधीक्षक
(३)उपमुख्य कार्यकारी अधिकारी (४)जिल्हाधिकारी

**प्र.९१–वाक्यात नामाऐवजी येणारा शब्द म्हणजे ..........**
(१)विशेषण (२)सर्वनाम (३)विशेष नाम (४)सामान्य नाम

**प्र.९२–नामाबद्दल विशेष माहिती सांगून त्याची व्याप्ती मर्यादित करणारा शब्द म्हणजे........**
(१)सर्वनाम (२) विशेषण (३)क्रियापद (४) यापैकी नाही

**प्र.९३–ते दृश्श अतिशय ........... होते(रिकाम्या जागी येग्य वापरा)**
(१)लोभस (२)गोंडस (३)सुंदर (४)विलोभनीय

**प्र.९४–B कोर्सनंतर कोणत्या प्राध्यापकांचा कोर्स सुरू होतो?**
(१)T (२)Q (३)P (४)S

**प्र.९५–जानेवारी महिन्यात कोणता कोर्स शिकवला जातो?**
(१)E (२)C (३)D (४)अपुरी

**प्र.९६–आकाश जिथे जमिनीला टेकल्यासारखे भासते ती जागा**
(१)संगम (२)सीमा (३)क्षितीज (४)अतिश

**प्र.९७–APPLE=5, BALL=24 तर CAT=?**
(१)५० (२)६० (३)६६ (४)७६

**प्र.९८–खालीलपैकी व्याकरणदृष्ट्या शुध्द शब्द ओळखा.**
(१)कोट्याधीश (२)कोट्यधीश
(३)कोट्याधिश (४)कोट्ट्याधीश

**प्र.९९–'ओनामा' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता?**
(१)प्रारंभ (२)हाक (३)संबोधन (४)प्रत्यंतर

**प्र.१००–कविता घराकडून पूर्व दिशेला ४ किमी चालत जाते नंतर ती दक्षिणेकडे वळते आणि ३किमी अंतर चालते. त्यानंतर ती पश्चिम दिशेला वळते नंतर ती तिच्या डाव्या हाताला वळून ६किमी चालते. आता ती तिच्या घराकडून कोणत्या दिशेला व किती किमी अंतरावर आहे?**
(१)१३ १३ किमी दक्षिण (२)१३ किममी नैऋत्य
(३)किमी उत्तर (४)५ किमी ईशान्य

## वरील प्रश्नांची उत्तरे

**उत्तरे-** (१) ४ (२) २ (३) ३ (४) ३ (५) ४ (६) २ (७) २ (८) ३ (९) ३ (१०) २ (११) ४ (१२) ४ (१३) ३ (१४) १ (१५) ४ (१६) ३ (१७) ४ (१८) ३ (१९) २ (२०) ३ (२१) २ (२२) २ (२३) २ (२४) ३ (२५) ३ (२६)१ (२७) ३ (२८) १ (२९) १ (३०) ३ (३१) १ (३२) १ (३३) २ (३४) ३ (३५) २ (३६) ३ (३७) २ (३८) ३ (३९) १ (४०) ३ (४१) २(४२) ३ (४३) ४ (४४) १ (४५) ३ (४६) १ (४७) १ (४८) २ (४९) ३ (५०) ४ (५१) २ (५२) ४ (५३) १ (५४)२ (५५) १ (५६) १ (५७) ३ (५८) ३ (५९) ३ (६०) १ (६१) ४ (६२) ३ (६३) २ (६४) २ (६५) ४ (६६) ३ (६७) ४ (६८) २ (६९) ४ (७०) २ (७१) ३ (७२) ३ (७३) १ (७४) ३ (७५) ४ (७६) ३ (७७) ४ (७८) ३ (७९) १ (८०) २ (८१) ३ (८२) ४ (८३) २ (८४) ४ (८५) १ (८६) १ (८७) ३ (८८) २ (८९) ३ (९०) १ (९१) २ (९२) २ (९३) ४ (९४) २ (९५) १ (९६) ३ (९७) २ (९८) २ (९९) १ (१००) ४

# पोलिस भरतीत येऊन गेलेले सराव प्रश्न

**प्र.१–एकत्रित आलेल्या....या दोन प्रवाहानाच पुढे गंगा नदी असे संबोधले जाते.**
(१)भगीरथी व अलकनंदा (२)भगीरथी व गंडक
(३)अलकनंदा व महानंदा (४)पिंडार व अलकनंदा

**प्र.२–भारतातील सर्वात मोठे नदी बेट कोणते?**
(१)पम्बन (२)मुचकूंद (३)फावक्का (४)माजूली

**प्र.३– आग्रा हे शहर....या नदीवर आहे?**
(१)गंगा (२)यमुना (३)भगीरथी (४)नर्मदा

**प्र.४–ब्रम्हपुत्रा ही नदी देशातील कोणत्या राज्यातून जाते?**
(१)जम्मू–काश्मीर (२)आसाम (३)उत्तर प्रदेश (४)बिहार

**प्र.५–मही चंबळ व बेटवा नद्या कोणत्या ठिकाणी उगम पावतात?**
(१)माळवा पठार (२)बुंदेलखंड
(३)छोटा नागपूरचे पठार (४)बाघेलखंड

**प्र.६–नर्मदा नदी कोणत्या समुद्राला जाऊन मिळते?**
(१)बंगालची खाडी (२)अरबी समुद्र
(३)हिंदी महासागर (४)यापैकी नाही

**प्र.७–भारतातील खालीलपैकी कोणती नदी त्रिभुज प्रदेश निर्माण करीत नाही?**
(१)गंगा (२)कावेरी (३)नर्मदा (४)गोदावरी

**प्र.८–माजुली या नदीपात्रात वसलेल्या बेटाला स्वतंत्र जिल्ह्या–चा दर्जा बहल करण्यात आला आहे?**
(१)भारतातील सर्वात मोठे बेट (२)भारतातील पहिला बेठ जिल्हा
(३)दुर्मिळ प्रजातीच्या पक्षाचे वास्तव्य
(१)फक्त अ (२)फक्त ब (३)अ व ब (४)सर्व बरोबर

**प्र.९–यमुना नदीच्या काठावर खालीलपैकी कोणते शहर नाही?**
(१)दिल्ली (२)आग्रा (३)मथुरा (४)उज्जैन

**प्र.१०–तिस्ता नदीचा उगम कोणत्या राज्यातून होतो?**
(१)प.बंगाल (२)बिहार (३)सिक्कीम (४)आसाम

**प्र.११–लखनौ हे शहर कोणत्या नदीकाठी वसले आहे?**
(१)यमुना (२)शरयू (३)वेदिका (४)गोमती

**प्र.१२–पुढीलपैकी काकेणती नदी सिंधु प्रणालीचा भाग नाही?**
(१)यमुना (२)सतलज (३)रावी (४)झेलस

**प्र.१३–शरावती नदीवरील जोग किंवा गिरसप्पाचा धबधबा हा भारतातील सर्वात मोठा धबधबा आहे?**
(१)कर्नाटक (२)महाराष्ट्र (३)तामिळनाडू (४)आध्रप्रदेश

**प्र.१४–खालीलपैकी कोणती पर्वत रांग जगातील सर्वोच्च पवृतरांग आहे?**
(१)अरवली (२)काराकोरम (३)सातपुडा (४)निलगिरी

**प्र.१५–'श्रावणबेळगोळ'हे तीर्थस्थान पर्वतात आहे?**
(१)हिमालय (२)सातपुडा (३)विंध्यगिरी (४)द्रोणाचल

**प्र.१६–कैमुरच्या टेकड्या खालीलपैकी कोणत्या पर्वतरांगा आहेत?**
(१)विंध्य रांगा (२)काराकाम रांगा
(३)सातपुडा रांगा (४)कोल्ली रांग

**प्र.१७–दक्षिण सह्याद्रीमधील सर्वात उंच शिखर कोणते?**
(१)कळसुबाई (२)धुपगड (३)अनाईमुडी (४)दोडाबेट्टा

**प्र.१८–पांबम बेट कोणत्या दोन देशांच्या दरम्यान आहे?**
(१)भारत–म्यानमार (२)भारत–मालदीव (३)भारत–श्रीलंका
(४)यापैकी नाही

**प्र.१९–हिमाचल पर्वत रांगांच्या गाभा....खडकांनी बनलेल्या आहेत?**
(१)कणाश्म खडक (२)पट्टीताश्म (३)दोन्ही (४)यापैकी नाही

**प्र.२०–पीरपंजाल रांग धौलाधार रांगांचा हिमालयाच्या कोणत्या पर्वतश्रेणींमध्ये आहे?**
(१)बृहत हिमालय (२)लघु हिमालय
(३)पूर्व हिमालय (४)यापैकी नाही

**प्र.२१–लाव्हारसापासून बनलेल्या खडकांना काय म्हणतात?**
(१)अग्निज खडक (२)गाळांचे खडक
(३)रूपांतरित खडक (४)यापैकी नाही

**प्र.२२–धुपगड–पंचमढी ही शिखरे कोणत्या पर्वतरांगेमध्ये अस्तित्वात आहेत?**
(१)सह्याद्री (२)सातपुडा (३)अरवली (४)निलगीरी

**प्र.२३–भारतातील सर्वात मोठे खाऱ्या पाण्याचे सरोवर कोणते?**
(१)बेंवनाड (२)पुलीकत (३)चिल्का (४)लोणार

**प्र.२४–मांजरा पठार कुठल्या भागात आहे?**
(१)मराठवाडा (२)विदर्भ (३)पश्चिम महाराष्ट्र (४)खानदेश

**प्र.२५–गुरूशिखर खालीलपैकी कोणत्या पर्वत रांगेचे सर्वोच्च शिखर आहे?**
(१)छोटा नागपूर (२)अरवली (३)विंध्य (४)मालवा

**प्र.२६–भारतातील एकमेव जीवंत ज्वालामुखी कोठे आहे?**
(१)लक्षव्दीप (२)अंदमान (३)छागोस (४)मालव

**प्र.२७–खालीलपैकी कोणत्या प्रक्रियेतून हिमालय पर्वत निर्माण झाला?**
(१)दरडी कोसळणे (२)वली प्रक्रिया
(३)ज्वालामुखी उद्रेक (४)वंश

**प्र.२८–भारतातील नुकताच जागृत झालेल्या एकमेव ज्वालामुखीचे नाव काय?**
(१)बॅरन बेट (२)ॲम्बी व्हॅली
(३)लाव्हा ऑफ अंदमान (४)लाव्हा ऑफ निकोबार

**प्र.२९–माळवा पठाराच्या बराच मोठा भाग कोणत्या राज्यात आहे?**
(१)महाराष्ट्र (२)गोवा (३)मध्य प्रदेश (४)हिमाचल प्रदेश

**प्र.३०–'बालीमेला'धरण कोणत्या राज्यात आहे?**
(१)मणिपूर (२)उत्तराखंड (३)सिक्किम (४)अरूणाचल प्रदेश

**प्र.३१–कांचनगंगा हे उंच शिखर कोणत्या राज्यात आहे?**
(१)मणिपूर (२)उत्तराखंड (३)सिक्कीम (४)अरुणाचल प्रदेश

**प्र.३२–पृथ्वीच्या सर्वात मधल्या थराला.....म्हणतात?**
(१)सायमा (२)सियाल (३)प्रावरण (४)मधला थर

**प्र.३३–भारतीय पठाराचे उत्तर व दक्षिण असे दोन भाग कोणत्या नदीमुळे पडले आहेत?**
(१)नर्मदा (२)तापी (३)गंगा (४)गोदावरी

**प्र.३४–खालीलपैकी कोणते एक उत्तर भारतीय मैदानी प्रदेशा–तील उष्ण स्थानिक वारे म्हणून निर्देशित करता येईल?**
(१)टायकुन (२)मलयानल (३)लु (४)भंभावात

**प्र.३५–विंध्य पर्वत हा कोणत्या प्रकारचा पर्वत आहे?**
(१)ज्वालामुखीय पर्वत (२)वली पर्वत
(३)अवशिष्ट पर्वत (४)यापैकी नाही

**प्र.३६–मनसर टेकड्या कोणत्या जिल्ह्यात आहेत?**
(१)गोंदिया (२)भंडारा (३)नागपूर (४)चंद्रपूर

**प्र.३७–भारतातील सर्वात मोठे बंदर कोठे आहे?**
(१)गोवा (२)कोची (३)मुंबई (४)विशाखापट्णम

**प्र.३८–झूम हा कशाचा प्रकार आहे?**
(१)शेतीचा (२)धानोरा (३)नृत्याचा (४)संगिताचा

**प्र.३९–सध्या चर्चेत असलेला मेडीगड्डा सिंचन प्रकल्प कोणत्या तालुक्यात आहे?**
(१)सिरोंचा (२)धानोरा (३)कुरखेडा (४)गडचिरोली

**प्र.४०–राजस्थानमध्ये शेळ्यांची कोणती जात प्रसिध्द आहे?**
(१)मालगुडी (२)चौकला (३)मारवाडी (४)लोही

**प्र.४१–दक्षिण भारतात पशुपालन हा मुख्यत: कोणाचा व्यवसाय आहे?**
(१)तोडा (२)धनगर (३)गोपाळ (४)बक्करबाल

**प्र.४२–काश्मीर खोऱ्यात कोणत्या प्रकारची मृदा आढळते?**
(१)चेस्टनट (२)रेबुर (३)टुंड्रा (४)पिट

**प्र.४३–मेहसाना ह्या जातीची म्हैस कोणत्या राज्यातील आहे?**
(१)महाराष्ट्र (२)गुजरात (३)राजस्थान (४)उत्तरप्रदेश

**प्र.४४–जेथे शेतजमिन पाण्यापेक्षा उच्च पातळीवर असते तेथे खालीलपैकी जलसिंचन पध्दतीचा वापर सुयोग्य ठरेल?**
(१)नाला बंडिंग (२)यसंत बंधारा
(३)समोच्च बांध बंदिस्त (४)उपसा जलसिंचन

**प्र.४५–खालीलपैकी ज्वारी या पिकाची प्रसिध्द जात कोणती?**
(१)मालदांडी ३५–१ (२)कल्याण सोना (३)श्रध्दा (४)शांती

**प्र.४६–वरलक्ष्मी, लक्ष्मी या खालीलपैकी कोणत्या पिकाची जाती आहेत?**
(१)कापूस (२)तूर (३)ज्वारी (४)सोयाबीन

**प्र.४७–जंगल मंदा.....रंगाची असते.**
(१)गडद पिवळा (२)गडद तपकिरी
(३)गडद लाल (४)गडद काळी

**प्र.४८–सर्वाधिक पावसाचे ठिकाण असणारे 'मोसिमराम' हे कोणत्या राज्यात आहे?**
(१)मेघालय (२)सिक्कीम (३)ओरिसा (४)मिझोराम

**प्र.४९–मान्सूपूर्व पडणाऱ्या पावसांच्या सरींना महाराष्ट्रत....म्हणतात?**
(१)चेरीब्लॉसम शॉवर्स (२)कालबैसाखी
(३)नॉर्वेस्टर (४)आम्रसरी

**प्र.५०–समुद्रातील त्सुनामी लाटा कशामुळे निर्माण होतात?**
(१)ज्वालामुखी (२)वाढते तापमान (३)नॉर्वेस्टर (४)आम्रसरी

**प्र.५१–भारतात लू वारे कोणत्या ऋतुत वाहतात?**
(१)उन्हाळा (२)हिवाळा (३)पावसाळा (४)तिन्ही ऋतुत

**प्र.५२–भारताच्या उत्तर भुभागावरून समुद्रकडे वाहणाऱ्या कोरड्या वाऱ्यांमुळे खालील पर्यायांपैकी कोणत्या ठिकाणी पाऊस पडतो?**
(१)कारवार (२)कावरत्ती (३)मछलीपट्टणम (४)मंगळुर

**प्र.५३–खालीलपैकी गटात न बसणारी बाब कोणती?**
(१)ज्वारी (२)मटकी (३)बाजरी (४)गहू

**प्र.५४–थंड प्रदेशातील जलचर प्राणी व वनस्पती.....मुळे सुरक्षित राहतात?**
(१)आर्द्रता (२)दवबिंदू
(३)विशिष्ट उष्माधारकता (४)पाण्याचे असंगत आचरण

**प्र.५५–ईशान्य मोसमी वारे....या कालावधीत वाहतात.**
(१)मे ते सप्टेंबर (२)नोव्हेंबर ते फेब्रुवारी
(३)जुलै ते डिसेंबर (४)जानेवारी ते मे

**प्र.५६–वातावरणाच्या वरच्या भागात काही ठिकाणी आढळणारे अति–वेगवान वारे म्हणजे.....**
(१)चक्रीवादळ (२)प्रतिचक्रीवादळ (३)जेट स्ट्रीम (४)त्सुनामी

**प्र.५७–ईशान्य मोसमी वाऱ्यापासून....च्या किनारी प्रदेशात पाऊस पडतो?**
(१)गोवा (२)महाराष्ट्र (३)तामिळनाडु (४)आसाम

**प्र.५८–'अल्मोडा' हे थंड हवेचे ठिकाण कोणत्या राज्यात आहे?**
(१)उत्तरप्रदेश(२)उत्तराखंड (३)छत्तीसगड (४)हिमाचलप्रदेश

**प्र.५९–वुलर हे गोड्या पाण्याचे सरोवरकोणत्या राज्यात आहे?**
(१)केरळ (२)आंध्र प्रदेश (३)जम्मू–करश्मीर (४)ओडिशा

**प्र.६०–बाशियातील सर्वात मोठी लोर बाजारपेठ पुढीलपैकी कोणत्या ठिकाणी आहे?**
(१)सुरतगड (२)बिकानेर (३)जोधपूर (४)जैसलमेर

**प्र.६१–भारतात एकूण....राज्ये आहेत, पैकी महाराष्ट्र राज्यात एकूण....जिल्हे आहेत.**
(१)२९,३५ (२)२७,३६ (३)२९,३६ (४)२७,३५

**प्र.६२–'धोलकाल'गणेशाची पर्वतावरील मुर्ती कोणत्या राज्यात आहे?**
(१)छत्तीसगढ (२)ओरीसा (३)महाराष्ट्र (४)आंध्र प्रदेश

**प्र.६३–कोणत्या दोन राज्यांना इंद्रावती नदीचा पुल जोडणार आहे?**
(१)महाराष्ट्र–मध्यप्रदेश (२)महाराष्ट्र–छत्तीसगड
(३)महाराष्ट्र–आंध्र प्रदेश (४)तेलंगणा–आंध्र प्रदेश

**प्र.६४–भरताचा सर्वात लहान केंद्रशासित प्रदेश कोणता?**
(१)पदुच्चेरी (२)दादर–नगर–हवेली (३)लक्षव्दीप(४)दीव–दमण

**प्र.६५–'सेल्युलर जेल' कोठे आहे?**
(१)दादरा,नगरहवेली (२)चंदीगढ (३)दमण (४)पोर्ट ब्लेअर

**प्र.६६–गंगटोक ही खालीलपैकी कोणत्या राज्याची राजधानी आहे?**
(१)त्रिपुरा (२)मिझोराम (३)मणिपूर (४)सिक्किम

**प्र.६७–साखरेचे भंडार म्हणून खालीलपैकी कोणत्या राज्य ओळखले जाते?**
(१)मध्यप्रदेश (२)उत्तरप्रदेश (३)अरुणाचलप्रदेश (४)पंजाब

**प्र.६८–जल्लीकट्टू हा सण कोणत्या राज्यात साजरा करतात?**
(१)केरळ (२)कर्नाटक (३)आंध्रप्रदेश (४)तामीळनाडू

**प्र.६९–पानिपत हे ठिकाण कोणत्या राज्यात आहे?**
(१)उत्तरप्रदेश (२)पंजाब (३)बिहार (४)हरियाणा

**प्र.७०–आंध्रप्रदेश राज्याची राजधानी कोणती?**
(१)विशाखापट्टणम(२)विजयवाडा(३)अमरावती(४) आदिलाबाद

**प्र.७१–भारताचा एकमेव जागृत ज्वालामुखी कोठे आहे?**
(१)गुजरात (२)अंदमान–निकोबार व्दीपसमूह
(३)महाराष्ट्र (४)अरुणाचल प्रदेश

**प्र.७२–धर्मशाळा हा जिल्हा कोणत्या राज्यात आहे?**
(१)उत्तराखंड (२)जम्मू–काश्मीर(३)हरियाणा (४) हिमाचलप्रदेश

**प्र.७३–पलामु अभयारण्य कोणत्या राज्यात आहे?**
(१)छत्तीसगढ (२)झारखंड (३)मध्यप्रदेश (४)बिहार

**प्र.७४–मिनी ही कोणत्या राज्याची प्रमुख भाषा आहे?**
(१)मणिपूर (२)नागालँड (३)आसाम (४)अरूणाचलप्रदेश

**प्र.७५–त्रिपुरा : अगरतला ? : गुवाहाटी**
(१)मिझोराम (२)आसाम (३)अरूणाचलप्रदेश (४)सिक्कीम

**प्र.७६–बॅरेन ज्वालामुखी कोठे आहे?**
(१)लक्षव्दीप (२)दमण (३)दिव (४)अंदमान–निकोबार

**प्र.७७–मिझोरामची राजधानी कोणती आहे**
(१)दिसपुर (२)गोहत्ती (३)ऐजवॉल (४)इम्फाळ

**प्र.७८–आंध्र प्रदेश राज्याची नवीन निर्मान होणारी राजधानीचे नाव काय?**
(१)विशाखपट्टणम (२)विजयवाडा (३)गुंटूर (४)अमरावती

**प्र.७९–दुधाची भुकटी बनविनणारा 'आणंद' हा दुग्ध प्रकल्प कोणत्या राज्यात आहे?**
(१)मध्यप्रदेश (२)राजस्थान (३)गुजरात (४)महाराष्ट्र

**प्र.८०–अंदमान–निकोबार बेटांचे राजधानीचे शहर कोणते आहे ?**
(१)छागोस (२)मालदिव (३)पोर्ट ब्लेअर (४)विशाखापट्टणम्

**प्र.८१–गोवा राज्याची राजधानी कोणती आहे?**
(१)म्हापसा (२)पणजी (३)मडगाव (४)वास्को

**प्र.८२–त्रिपुराची राजधानी कोणती आहे?**
(१)शिलाँग (२)कोहिमा (३)अगरतळा (४)दिसपुर

**प्र.८३–भारतात शिलालेखाचा सर्वात मोठा संग्रह.....येथे आहे?**
(१)म्हैसूर (२)नाशिक (३)मुंबई (४)दिल्ली

**प्र.८४–थुंबा या ठिकाणाजवळ कोणते शहर आहे?**
(१)तिरुवअनंतपूरम (२)श्रीहरिकोटा (३)चेन्नई (४)बंगळूसर

**प्र.८५–कर्नाटक राज्याला महाराष्ट्रतील किती जिल्ह्याची सीमा लागते?**
(१)७ (२)८ (३)६ (४)५

**प्र.८६–भारतातील अलंग हे बंदर जुन्या जहाजाचे भंगार वसुटे भाग करण्यासाठी प्रसिध्द आहे हे बंदर कोणत्या राज्यामध्ये आहे?**
(१)गुजरात (२)प.बंगाल (३)महाराष्ट्र (४)तमिळनाडू

**प्र.८७–महाराष्ट्र : मुंबई तसेच मेघालय: ?**
(१)शिलाँग (२)गंगटोक (३)आसाम (४)अगरतळा

**प्र.८८–तवांग हे ठिकाण कोणत्या राज्यात आहे ?**
(१)मिझोराम(२)मणिपूर (३)अरूणाचलप्रदेश (४)हिमाचल प्रदेश

**प्र.८९–ओरिसा : भूवणेश्वर :: मणिपूर : ?**
(१)अगरतळा (२)इंफाळ (३)गुवाहाटी (४)गंगटोक

**प्र.९०–हरियाणातील अंतरराष्ट्रीय ख्यातीचा गुरबाव हा जिल्हा सध्या कोणत्या नावाने ओहखला जातो?**
(१)गाडेगाव (२)गुरूथाम (३)गुरूग्राम (४)गुरुदक्षिण

**प्र.९१–खालीलपैकी कोणत्या माशाचा प्रकार नाही?**
(१)चातक (२)काळंबी (३)बोंबील (४)काणे

**प्र.९२–मणिपूर राज्याची राजधानी......आहे?**
(१)अगरतळा (२)इंफाळ (३)कोहिमा (४)गुवाहटी

**प्र.९३–कवरत्ती ही कोणत्या संघराज्य प्रदेशाची राजधानी नाही?**
(१)अंदमान–निकोबार (२)चंदीगड (३)लक्षव्दीप (४)पाँडेचेरी

**प्र.९४–.....हे देशातील अतिपर्वेचे राज्य आहे?**
(१)आसाम (२)अरूणाचलप्रदेश (३)मणिपूर (४)सिक्कीम

**प्र.९५–भारततील रेशीम उत्पादनातील अग्रेसर राज्य कोणते?**
(१)कर्नाटक (२)महाराष्ट्र (३)केरळ (४)गुजरात

**प्र.९६–भारत देशामध्ये कापूस या पिकाचे सर्वाधिक उत्पादन करणारे राज्य कोणते?**
(१)गुजरात (२)महाराष्ट्र (३)मध्यप्रदेश (४)कर्नाटक

**प्र.९७–पृथ्वीच्या सूर्याभोवती फिरण्यास पृथ्वीचे....म्हणतात?**
(१)परिवलन (२)परिभ्रमण (३)गति (४)यापैकी नाही

**प्र.९८–कोणत्या देशामध्ये रात्रीचा सूर्य दिसतो?**
(१)अमेरिका (२)ऑस्ट्रेलिया (३)फ्रान्स (४)नॉर्वे

**प्र.९९–कोणते अक्षवृत्त पृथ्वीला दोन समान भागात विभागते?**
(१)कर्कवृत्त (२)मकरवृत्त (३)विषुववृत्त (४)आर्क्टिकवृत्त

**प्र.१००–पृथ्वी सूर्याभोवती फिरते हा सिध्दान्त कोणी मांडला?**
(१)केपरल (२)गॅलिलीओ (३)कोपर्निकस (४)सर आयझॅक न्यूटन

## वरील प्रश्नांची उत्तरे

**उत्तरे-** (१) १ (२) ४ (३) २ ४) २ (५) २ (६) २ (७) ३ (८) ४ (९) ४ (१०) १ (११) ४ (१२) १ (१३) १ (१४) २ (१५) ३ (१६) १ (१७) ३ (१८) ३ (१९) १ (२०) २ (२१) १ (२२) २ (२३) ३ (२४) १ (२५) २ (२६) २ (२७) २ (२८) १ (२९) ३ (३०) ४ (३१) ३ (३२) ३ (३३) १ (३४) ३ (३५) ३ (३६) ३ (३७) ४ (३८) १ (३९) १ (४०) ४ (४१) १ (४२) ४ (४३) २ (४४) ४ (४५) १ (४६) १ (४७) २ (४८) १ (४९) ४ (५०) ३ (५१) १ (५२) ३ (५३) २ (५४) ४ (५५) २ (५६) ३ (५७) ३ (५८) २ (५९) ३ (६०) २ (६१) ३ (६२) १ (६३) २ (६४) ३ (६५) ४ (६६) ४ (६७) २ (६८) ४ (६९) ४ (७०) ३ (७१) २ (७२) ४ (७३) २ (७४) ४ (७५) २ (७६) ४ (७७) ३ (७८) ४ (७९) ३ (८०) ३ (८१) २ (८२) ३ (८३) १ (८४) १ (८५) १ (८६) २१ (८७) १ (८८) ३ (८९) २ (९०) ३ (९१) १ (९२) २ (९३) ३ (९४) २ (९५) १ (९६) १ (९७) २ (९८) ४ (९९) ३ (१००) ३

# अमेरिका आणि रशियानंतर भारताचे हवाई दल सर्वात शक्तिशाली

**चीनला मागे टाकलं, पाकिस्तान कितव्या नंबरवर?**

ग्लोबल फायरपॉवर २०२५ च्या आकडेवारीनुसार, अमेरिकेची हवाई शक्ती अतुलनीय आहे, जी रशिया, चीन, भारत, दक्षिण कोरिया आणि जपानच्या एकत्रित हवाई क्षमतेला मागे टाकते. कारण जागतिक लष्करी खर्चात त्यांचा वाटा जवळजवळ ४० टक्के आहे. जगातील सर्वात शक्तिशाली हवाई दलांच्या यादीत अमेरिकेचे वर्चस्व आहे, तर रशिया दुसऱ्या क्रमांकावर आहे. तथापि, भारताने ताकदीच्या बाबतीत चीनच्या हवाई दलाला मागे टाकले आहे. जगातील हवाई दलांवर लक्ष ठेवणारी संस्था थऊव्चच–नुसार अमेरिका आणि रशियानंतर भारताचे हवाई दल सर्वात शक्तिशाली मानले जाते. दुसरीकडे, चीन चौथ्या क्रमांकावर आहे. या यादीत पाकिस्तान पहिल्या १० मध्येही स्थान मिळवू शकलेला नाही.

सध्याच्या थऊव्चच– यादीत १२९ हवाई सेवा (लष्कर, नौदल आणि सागरी शाखांसह) समाविष्ट असलेल्या १०३ देशांचा समावेश आहे. या सर्वेक्षणात एकूण ४८,०८२ विमानांचा समावेश आहे. दुसरीकडे, २०व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच युद्धात महत्त्वाची भूमिका बजावणारी आणि जगभरातील सशस्त्र दलांसाठी एक आवश्यक संपत्ती म्हणून काम करणारी हवाई शक्ती ही जागतिक वर्चस्वात निर्णायक घटक राहिली आहे.

भारतीय हवाई दलाची ब्रिटिश राजवटीत स्थापना

दुसरीकडे, दरवर्षी ८ ऑक्टोबर रोजी भारतीय हवाई दल स्थापना दिवस साजरा करतो. भारतीय हवाई दल केवळ भारताच्या संरक्षणात महत्त्वाची भूमिका बजावत नाही तर गौरवशाली इतिहास, विशेष कामगिरी आणि अद्वितीय सामर्थ्य प्रकट होते. भारतीय हवाई दलाची स्थापना ८ ऑक्टोबर १९३२ रोजी ब्रिटिश राजवटीत सहाय्यक दल म्हणून करण्यात आली. सुरुवातीला ते रॉयल इंडियन एअर फोर्स म्हणून ओळखले जात असे. भारतीय हवाई दलाच्या प्रमुख ऑपरेशन्समध्ये ऑपरेशन मेघदूत, ऑपरेशन सफेद सागर, ऑपरेशन पूमलाई, ऑपरेशन बालाकोट आणि ऑपरेशन सिंदूर यांचा समावेश आहे. ऑपरेशन सफेद सागर १९९९ च्या कारगिल युद्धादरम्यान चालवण्यात आले होते. भारतीय हवाई दलाचे ब्रीदवाक्य नभः स्पृशयम् दीप्म आहे. हे वाक्य भगवद्गीतेच्या अकराव्या अध्यायातून घेतले आहे.भारतीय हवाई दल हे कर्मचारी आणि विमानांच्या बाबतीत जगातील चौथी सर्वात मोठी हवाई दल आहे. त्यांच्याकडे १७०० हून अधिक विमाने आहेत आणि सुमारे १४०,००० कर्मचारी कार्यरत आहेत.

भारतीय हवाई दलाने पाकिस्तानसोबतच्या चार युद्धांमध्ये (१९४७, १९६५, १९७१ आणि १९९) आणि चीनसोबतच्या एका युद्धात (१९६२) भाग घेतला आहे.जगातील सर्वात उंच हवाई पट्टी: ही भारतातील लडाखमधील दौलत बेग ओल्डी येथे आहे. ही हवाई पट्टी समुद्रसपाटीपासून सुमारे १६,६१४ फूट उंचीवर आहे. ही हवाई पट्टी भारतीय हवाई दलासाठी सामरिकदृष्ट्या महत्त्वाची आहे.आधुनिक लढाऊ विमाने आणि विमाने: भारतीय हवाई दलाकडे सुखोई–३० एमकेआय, मिराज–२००० आणि तेजस सारख्या लढाऊ विमानांसह नवीनतम विमाने आणि तंत्रज्ञान आहे.



# आदि कर्मयोगी अभियानात सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी गडचिरोली जिल्ह्याला राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्रदान

**नौकरी एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/ प्रतिनिधी/** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते धरती आबा जनभागीदारी अभियान मध्ये सर्वो त्कृष्ट राज्य म्हणून महाराष्ट्र आणि 'आदि कर्मयोगी अभियानात सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी गडचिरोली जिल्हा यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात आयोजित आदी कर्मयोगी अभियान राष्ट्रीय परिषदेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या राज्य, जिल्हा, तालुके आणि एकात्मिक आदिवासी विकास संस्थांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. धरती आबा जनभागीदारी अभियान महाराष्ट्र राज्याचा पुरस्कार आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे यांनी स्वीकारला. तर आदि कर्मयोगी अभियानात सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी गडचिरोली जिल्हा पुरस्कार जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी स्वीकारला.



राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू म्हणाल्या की, ही परिषद आपल्या शासनाला खऱ्या अर्थाने सहभागी, सर्वसमावेशक आणि लोकसहभागावर आधारित करण्याच्या राष्ट्रीय संकल्पाचे प्रतिबिंब आहे. आदि कर्मयोगी अभियानाची सुरुवात प्रत्येक आदिवासी गावाला स्वावलंबी आणि अभिमानास्पद बनवण्याच्या परिवर्तनकारी दृष्टिकोनातून झाली आहे. या अभियानाचा उद्देश आदिवासी समुदायांना राष्ट्राच्या विकास प्रवासात सहभागी करून घेणे आणि विकासाच्या लाभांचा प्रसार सर्व आदिवासी क्षेत्र आणि लोकांपर्यंत पोहोचवणे हा आहे. आदिवासी कृती आराखडा आदिवासी लोकांच्या आणि देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. आदि कर्मयोगी अभियान ग्रामसभाल आणि समुदाय-नेतृत्वाखालील संस्थांना सक्षम करून लोकसहभाग वाढविण्यासाठी चालना देते. आदिवासी समाजाच्या अर्थपूर्ण सहभागामुळे राष्ट्रीय धोरणावर प्रभाव पडू शकतो आणि योजना अधिक प्रभावी बनवता येऊ शकतात, असे मूर्मू यांनी सांगितले.

आदिवासी समुदाय हे देशाच्या सामाजिक-सांस्कृतिक विविधतेचा महत्त्वपूर्ण भाग आहेत. आदिवासी परंपरा विकास हा निसर्गाशी सुसंवाद साधणारा असावा याची जाणीव करून देतात. गेल्या काही वर्षांत, सरकारने आदिवासी समुदायांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक ठोस पावले उचलली आहेत. या प्रयत्नांचा उद्देश केवळ आर्थिक सहाय्य पुरवणे हा नसून शिक्षण, आरोग्य, रोजगार, तांत्रिक कौशल्ये आणि शासनात समान सहभागाच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे.

सरकारने आदिवासी क्षेत्रात पायाभूत सुविधांचा वेगाने विस्तार केला आहे आणि आदिवासी युवकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी निवासी शाळा आणि शिष्यवृत्ती कार्यक्रम स्थापन केले आहेत. कौशल्य विकास आणि स्वयंरोजगार योजनांनी पारंपरिक हस्तकला, हस्तकौशल्य आणि उद्योजकतेला नवीन गती दिली आहे. या प्रयत्नांमुळे केवळ उपजीविकेच्या संधी वाढल्या नाहीत.

तर आदिवासी लोकांमध्ये आत्मविश्वास आणि स्वावलंब वाढले असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले. विकसित भारताच्या प्रवासात आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की राष्ट्र आणि समाजाचा खरा विकास हा सर्व समाजघटकांच्या विकासात आहे.

आपण एक सर्वसमावेशक समाज निर्माण केला पाहिजे, जिथे सर्व नागरिक अर्थपूर्ण सहभाग घेऊ शकतील आणि आपले भवितव्य स्वतः घडवण्यास सक्षम असतील, असेही राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी सांगितले.

माहिती खात्रीची व प्रगतीची, देतो वेध भविष्याचा..

नौकरी एक्सप्रेस

नौकरी एक्सप्रेस घरपोच योजना

★ महाराष्ट्र शासन, केंद्र शासन, संरक्षण सेवा, विविध बँका, रेल्वे, महामंडळे, सैन्य भरती, नौदल, हवाई दल, भुदल, कोस्ट गार्ड, होम गार्ड, महाराष्ट्र पोलिस भरती, रेल्वे पोलिस भरती, केंद्रीय पोलिस भरती, एनडीए, विविध शासकिय निमशासकीय यासह एमपीएससी/युपीएससी प्रश्नपत्रिका संच, चालु घडामोडी, स्पर्धा परिक्षा शब्दकोडे, या सह मुलांच्या भविष्यासाठी उत्कृष्ट व खात्रीलायक माहिती देणारे महाराष्ट्राचे एकमेव वृत्तपत्र नौकरी एक्सप्रेस!

★ या वृत्तपत्राचा घरपोच अंक मिळविण्यासाठी वार्षिक वर्गणीदार व्हा. कार्यलयाच्या वतीने प्रत्येक सोमवारी अंक घरपोच पोस्टाने पाठविण्यात येईल.

नौकरी एक्सप्रेस वार्षिक वर्गणी दर – ७५०/– रूपये

सहामाहि वर्गणी – ४००/– रूपये

-: वर्गणीदारांनी आपली वर्गणी पाठविण्याचा पत्ता :-

नौकरी एक्सप्रेस मुख्य कार्यालय

प्लॉट नंबर- पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी,
एन ५ सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३

किंवा

नौकरी एक्सप्रेस या नावाने बँक ऑफ महाराष्ट्राच्या कोणत्याही शाखेतुन खाते क्रमांक 60122255284 या खात्यात भरणा करावी व सदरील भरणा केलेली पावती ई-मेल किंवा व्हॉट्सअॅप नंबर- 9421281078 यावर पाठवावी.

Email-naukriexpress.impact@gmail.com

www.naukriexpress.co.in

# BSF कॉन्स्टेबल GD भरती

सीमारेषा सुरक्षा दल (BSF) ने स्पोर्ट्स कोटा अंतर्गत ग्रुप-C कॉन्स्टेबल (जनरल ड्युटी) च्या ३९१ पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू केली आहे. इच्छुक आणि पात्र १० वी उत्तीर्ण उमेदवार rectt.bsf.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज.

सीमारेषा सुरक्षा दल (Border Security Force - BSF) ने ग्रुप-C कॉन्स्टेबल (जनरल ड्युटी) पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू केली आहे. या भरतीसाठी अर्ज प्रक्रिया १७ ऑक्टोबर २०२५ पासून सुरू झाली असून अर्ज करण्याची अंतिम दिनांक ४ नोव्हेंबर २०२५, रात्री ११:५९ वाजेपर्यंत आहे. इच्छुक उमेदवार rectt.bsf.gov.in(https://rectt.bsf.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन अर्ज करू शकतात.

ही भरती स्पोर्ट्स कोटा (Sports Quota) अंतर्गत केली जात असून फक्त त्या उमेदवारांसाठी आहे ज्यांनी राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळांमध्ये पदक जिंकले आहे, स्थान मिळवले आहे किंवा सहभाग नोंदवला आहे.

या भरतीअंतर्गत BSF मध्ये ग्रुप-C कॉन्स्टेबल पदांची भरती केली जाणार असून एकूण ३९१ पदे उपलब्ध आहेत.

**पात्रता-** उमेदवारांनी कोणत्याही मान्यताप्राप्त मंडळाकडून १०वी (मॅट्रिक) परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

**वय-**अर्जदाराचे वय १८ ते २३ वर्षांच्या दरम्यान असावे. आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना शासन नियमानुसार सवलत दिली जाईल.

**खेळ पात्रता-**उमेदवाराकडे इडत्र्क च्या अधिसूचनेत नमूद केलेल्या खेळांपैकी कोणत्याही खेळातील राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरील सहभाग अथवा पारितोषिकांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

**अर्ज शुल्क-**सर्वसाधारण आणि ओबीसी प्रवर्गातील पुरुष उमेदवारांना १५९ अर्ज शुल्क भरावे




लागेल.

महिला उमेदवार तसेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना कोणतेही शुल्क द्यावे लागणार नाही.सदरील अर्ज शुल्काचे पेमेंट ऑनलाइन मोडद्वारे (क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेट बँकिंग, ई-वॉलेट इत्यादी) करावे लागेल.

**अर्ज कसा करावा?**

सर्वप्रथम rectt.bsf.gov.in(https://rectt.bsf.gov.in) या BSF च्या अधिकृत संकेतस्थळावर जा.

Group-C Constable (GD Under Sports Quota) २०२५ या लिंकवर क्लिक करा.

apply Here वर क्लिक करून नवीन नोंदणी करा.

अर्ज फॉर्ममध्ये आवश्यक माहिती भरा आणि मागितलेली कागदपत्रे अपलोड करा.

अर्ज शुल्क भरून फॉर्म सबमिट करण्यापूर्वी सर्व माहिती नीट तपासा.

अर्ज सबमिट झाल्यानंतर कन्फर्मेशन पेज डाउनलोड करून प्रिंट काढून ठेवा.

# रेल्वेमध्ये १ हजार ७६३ पदांसाठी भरती

**नौकरी एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/ प्रतिनिधी/** रेल्वेमध्ये नोकरी करण्याची इच्छा असणाऱ्या तरुणांसाठी मोठी संधी निर्माण झाली आहे. तुमची पात्रता जर १० वी किंवा आयटीआय असेल, तर तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. प्रयागराज येथील रेल्वे रिक्रूटमेंट सेल (आरआरसी) द्वारे आयोजित उत्तर मध्य रेल्वेमध्ये १ हजार ७६३ अप्रेंटिस पदांसाठी भरती प्रक्रिया सुरु झाली आहे.या पदांसाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी अधिकृत वेबसाइट, ीलीिूं.ीस ला भेट देऊन अर्ज प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी. ही भरती उत्तर मध्य रेल्वेच्या विविध विभागांमधील अप्रेंटिस पदांसाठी आहे. ही भरती १० वी उत्तीर्ण आणि आयटीआय पात्र उमेदवारांना रेल्वेमध्ये करिअर करण्याची सुवर्ण संधी प्रदान करते.




आवश्यक पात्रता काय?

या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना मान्यताप्राप्त बोर्डाकडून दहावी (एसएससी) किंवा त्याच्या समकक्ष परीक्षेत किमान ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त, उमेदवारांकडे संबंधित ट्रेडमध्ये आयटीआय प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. ही शैक्षणिक पात्रता अनिवार्य आहे.

वय-वय मर्यादेबाबत, १६ सप्टेंबर २०२५ रोजी अर्जदारांचे वय किमान १५ वर्षे आणि कमाल २४ वर्षे असणे आवश्यक आहे. तर राखीव प्रवर्गातील उमेदवारांना नियमांनुसार वयात सूट मिळेल. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना ५ वर्षांची वयोमर्यादा, ओबीसी उमेदवारांना ३ वर्षांची सूट आणि दिव्यांग उमेदवारांना १० वर्षांची अतिरिक्त सूट मिळेल.

अर्ज करण्यासाठी किती फी?

अर्ज शुल्काबाबत, सामान्य आणि इतर मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना १०० रुपये भरावे लागतील. अनुसूचित जाती, जमाती, महिला, ट्रान्सजेंडर आणि दिव्यांग उमेदवारांना कोणतेही शुल्क भरावे लागणार नाही. हे शुल्क ऑनलाइन भरले जाईल.

अर्ज कसा करावा?

अर्ज प्रक्रिया देखील खूप सोपी आहे. प्रथम, उमेदवारांनी ीलीिूं.ीस वेबसाइटला भेट द्यावी आणि अॅक्ट अप्रेंटिस भरती २०२५लिंकवर क्लिक करावे. त्यानंतर, अर्ज फॉर्म भरा आणि शैक्षणिक प्रमाणपत्रे, फोटो आणि स्वाक्षरीसह सर्व आवश्यक कागदपत्रे अपलोड करा. त्यानंतर, अर्ज फी भरा आणि सबमिट करण्यापूर्वी सर्व माहिती पुन्हा तपासा. सबमिट केल्यानंतर, अर्ज फॉर्मची प्रिंटआउट ठेवा. दरम्यान, ज्या तरुणांना रेल्वेत नोकरी करायची इच्छा आहे त्यांच्यासाठी ही मोठी संधी आहे. त्यामुळं पात्रअसणाऱ्या उमेदवारांनी तातडीने या पदांसाठी अर्ज करावेत. कमी शिक्षण असणाऱ्यांसाठी सरकारी नोकरीची संधी मिळणार आहे.

# गोव्याचे माजी मुख्यमंत्री रवी नाईक

पान ७ वरुन

एकूण अंदाजे ८५० दिवस. ते लोकसभेवर निवडून आले आणि १९९८ ते १९९९ पर्यंत संसद सदस्य म्हणून काम केले.

नाईक हे अनेक वर्षे काँग्रेसचा एक प्रमुख चेहरा

नाईक हे अनेक वर्षे गोव्यात काँग्रेस पक्षाचा एक प्रमुख चेहरा होते. २०२२ च्या गोवा विधानसभा निवडणुकीच्या काही काळापूर्वी, नाईक भाजपमध्ये सामील झाले आणि प्रमोद सावंत यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये त्यांची कृषी मंत्री म्हणून नियुक्ती झाली.

रवी नाईक यांच्या निधनानंतर गोव्याचे विद्यमान मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी शोक व्यक्त करत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. आमचे ज्येष्ठ नेते आणि कॅबिनेट मंत्री रवी नाईक जी यांच्या निधनाने आम्हाला खूप दुःख झाले आहे. गोव्याच्या राजकारणातील एक दिग्गज नेते, मुख्यमंत्री आणि महत्त्वाच्या खात्यांचे मंत्री म्हणून त्यांनी दशकांपासून केलेल्या समर्पित सेवेने राज्याच्या प्रशासनावर आणि जनतेवर अमिट छाप सोडली आहे. त्यांचे नेतृत्व, नम्रता आणि सार्वजनिक कल्याणातील योगदान नेहमीच लक्षात ठेवले जाईल.

# टेरीटोरियल आर्मीत मोठी भर्ती

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/**टेरीटोरियल आर्मी भर्ती रॅली २०२५ ही माजी सैनिकांसाठी पुन्हा देशसेवेची संधी आहे. अर्ज प्रक्रिया मोफत असून पात्र उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळावरून तपशील पाहावेत.

भारतीय टेरीटोरियल आर्मीने माजी सैनिकांसाठी भर्ती रॅली २०२५ साठी अल्प अधिसूचना जाहीर केली आहे. या रॅलीत अधिकारी, कनिष्ठ अधिकारी आणि इतर श्रेणीतील पात्र पुरुष उमेदवारांना सहभागी होण्याचे आमंत्रण देण्यात आले आहे. देशभरातील विविध टेरीटोरियल आर्मी ग्रुप मुख्यालयांमध्ये या रॅलीचे आयोजन करण्यात येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी अधिकृत अधिसूचना काळजीपूर्वक वाचून पात्रता, आवश्यक कागदपत्रे आणि रॅलीचे वेळापत्रक तपासावे.

टेरीटोरियल आर्मी ही देशासाठी सेवा देणारी अर्धवेळ स्वेच्छा दल आहे, ज्यामध्ये प्रशिक्षित नागरीक आणि माजी सैनिकांचा समावेश असतो. या भरती मोहिमेचा उद्देश विविध युनिट्समधील रिक्त पदे रॅलीच्या माध्यमातून भरून काढणे आहे. अधिकृत अधिसूचना टेरीटोरियल आर्मीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असून, उमेदवार आपल्या प्रदेशानुसार निश्चित केलेल्या तारखांना रॅलीला हजर राहू शकतात.

या भरतीसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. सर्व श्रेणीतील उमेदवार -ओपन,ओबीसी,इमाव, एससी,एसटी आणि Ex-Servicemen यांच्यासाठी अर्ज प्रक्रिया पूर्णपणे मोफत आहे.

या भरतीअंतर्गत एकूण ७१६ सैनिक पदे (भरण्यात येणार आहेत. उमेदवारांकडे शैक्षणिक पात्रता पाहिली तर किमान १०वी उत्तीर्ण शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे. किमान दहावी पास उमेदवार या भरतीसाठी अर्ज करण्यास पात्र आहेत. उमेदवारांचे एकूण वय १८ ते ४२ वर्षांदरम्यान असावे. वयोमर्यादेत सवलत टेरीटोरियल आर्मीच्या नियमांनुसार पात्र उमेदवारांना लागू होईल.

या भरती प्रक्रियेत उमेदवारांची निवड पुढील टप्प्यांद्वारे केली जाईल:

१. दस्तऐवज पडताळणी
२. शारीरिक चाचणी
३. लेखी परीक्षा
४. वैद्यकीय तपासणी

यानंतर पात्र उमेदवारांची अंतिम गुणवत्तायादी प्रसिद्ध केली जाईल.

भारत सरकारने 'इंडिया-एआय इम्पॅक्ट समिट २०२६' अंतर्गत मागवले अर्ज! 'या' तारखेपर्यंत करता येणार या रॅलीत सहभागी होण्यासाठी उमेदवारांनी आपल्या सर्व कागदपत्रांसह निश्चित तारखेला हजर राहणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी आणि संपूर्ण वेळापत्रकासाठी उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळ www.jointerritorialarmy.gov.in (https://www.jointerritorialarmy.gov.in) ला भेट द्यावी.ही भरती देशसेवेसाठी पुन्हा योगदान देऊ इच्छिणाऱ्या माजी सैनिकांसाठी एक उत्तम संधी आहे.

# पहिल्या प्रयत्नात आले अपयश

परदेशातील आरामदायी जीवन सोडून, सृष्टी मिश्रा यांनी वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी यूपीएससीची निवड केली. पहिल्या प्रयत्नात अपयश आल्यानंतरही, दुसऱ्या प्रयत्नात त्यांनी ९५ वा अखिल भारतीय क्रमांक मिळवला.

**वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सोडून आली परदेशातील सारं काही!**

वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी परदेशातील सुखसुविधा, आरामदायी जीवन आणि सर्व काही मागे सोडून भारतात परत आलेली सृष्टि मिश्रा ही आज देशातील अनेक तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरली आहे. साऊथ आफ्रिकेत शिक्षण घेतलेल्या सृष्टि यांनी वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी यूपीएससीची वाट निवडली. पहिल्या प्रयत्नात त्यांना अपयश आले, मात्र त्यांनी हार मानली नाही. दुसऱ्या प्रयत्नात त्यांनी अखिल भारतीय स्तरावर ९५वा क्रमांक मिळवत खझड अधिकारी होण्याचं स्वप्न पूर्ण केलं.सृष्टिचे वडील परराष्ट्र व्यवहार मंत्रालयात अंडर सेक्रेटरी म्हणून कार्यरत असून त्यांची बदली साऊथ आफ्रिकेत झाली होती. त्यामुळे सृष्टिचं शिक्षण परदेशातच झालं. परंतु, भारतात येऊन वडिलांचं स्वप्न पूर्ण करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. यूपीएससीसारखी कठीण परीक्षा पार करण्यासाठी त्यांनी दिवस-रात्र मेहनत घेतली.

अपयशानंतरच्या काळाबद्दल सृष्टि सांगतात, पहिल्या प्रयत्नात अपयश आलं तेव्हा मनात खूप प्रश्न आले, पण त्या काळात स्वतःवर विश्वास ठेवणं आणि सकारात्मक राहणं हेच माझं सर्वात मोठं बळ ठरलं. त्या अपयशाला अडथळा न मानता त्यांनी त्याचं रूपांतर शिकवणीत केलं आणि दुगणी मेहनत घेत पुन्हा प्रयत्न केला. सृष्टिच्या यशामागे त्यांच्या वडिलांचे मार्गदर्शन आणि कुटुंबाचा ठाम विश्वास होता. त्यांच्या घरात शिक्षणाला नेहमीच विशेष स्थान आहे. सृष्टि म्हणतात, वडिलांनी नेहमी शिकवलं की स्वप्न कितीही मोठं असलं तरी प्रयत्न थांबवू नयेत. आज त्या आपल्या चिकाटी, जिद्द आणि आत्मविश्वासामुळे देशातील असंख्य युवांसाठी प्रेरणादायी ठरल्या आहेत.

इच्छुकांनी करा अर्ज

अशा प्रकारे करा णझडउ ची तयारी:

UPSC ही भारतातील सर्वात कठीण परीक्षा मानली जाते, पण योग्य नियोजन, चिकाटी आणि सातत्याने अभ्यास केल्यास यश मिळवणे शक्य आहे. सर्वप्रथम, अभ्यासाचा ठोस आराखडा तयार करा आणि विषयानुसार वेळेचे व्यवस्थापन शिका. प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास करा, नोट्स बनवा आणि नियमित पुनरावलोकन करा. चालू घडामोडींसाठी रोज वर्तमानपत्र वाचा आणि सरकारी संकेतस्थळांवरील अहवालांचा अभ्यास करा. मॉक टेस्ट आणि मागील प्रश्नपत्रिकांवर सराव करा, त्यामुळे आत्मविश्वास वाढतो. अपयश आल्यास निराश न होता अनुभवातून शिका, कारण णझडउ फक्त ज्ञानाची नाही, तर संयम आणि मानसिक ताकदीचीही परीक्षा असते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2010/34125

The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813